
# डिटेक्टीव्ह अल्फा

## जुन्या घराचे गूढ

सौरभ वागळे



# जुन्या घराचे गूढ

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# डिटेक्टिव्ह अल्फा

भाग - 3

## जुन्या घराचे गूढ

सौरभ वागळे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

डिटेक्टिव्ह अल्फ़ा

## **जुन्या घराचे गूढ** (रहस्यकथा)

लेखक : सौरभ वागळे
'निसर्ग' प्लाझा, सांगलीवाडी,
सांगली.
फोन : 8983234042
ईमेल : sourabhwagale@yahoo. Com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ३ जून २०१८

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना**

लहानपणी एखाद्या मित्राशी मस्त गट्टी जमावी आणि काही दिवसांनी तो मित्र शाळाच सोडून जावा, अशी काहीशी स्थिती माझी गेली दोन वर्षे झाली होती.. आणि मला वाटतं अल्फाच्या वाचकांचीही तीच परिस्थिती असेल. कारण अल्फाचे पहिले दोन भाग प्रकाशित झाल्यानंतर दोन वर्षे मला अल्फाचे कारनामे वेळेअभावी लिहिता आले नाहीत आणि पर्यायाने वाचकांना ते वाचताही आले नाहीत. पण लेखनाची साद आणि वाचकांचा प्रतिसाद यांनी मला पुन्हा लेखणी हातात घेणे भाग पाडले आणि मी अल्फाचा तिसरा भाग लिहायला घेतला.

मागील भागांप्रमाणे याही भागात अल्फाने आपल्या अफलातून तर्कशास्त्राने कुतूहलजनक वाटणाऱ्या प्रकरणांचा मोठ्या हुशारीने छडा लावला आहे. वाचकांना अल्फाचे नवे ॲडव्हेंचर्स नक्की आवडतील, अशी मला खात्री आहे. 'अल्फा सिरीज' पुढे नेण्यामध्ये सर्वात मोठा वाटा हा वाचकांचाच आहे. केवळ महाराष्ट्र आणि भारतच नव्हे, तर जगाच्या पाठीवर विविध ठिकाणी असलेल्या मराठी वाचकांच्या प्रतिक्रिया म्हणजे माझ्या लिखाणाचा 'ड्रायव्हिंग फोर्स'च आहे, असे मला वाटते. त्यामुळे त्यांचे सर्वप्रथम मी आभार मानतो. त्यानंतर अर्थातच, ईसाहित्य टिम, जी नेहमीच अल्फा आणि वाचक यांच्यातला दुवा बनत आली आहे, त्यांनी यावेळीही अल्फाला वाचकांपर्यंत यशस्वीपणे पोहोचवले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

डिटेक्टिव्ह अल्फाची सिरीज सुरू राहील आणि आपली मैत्रीही.. . !!

मनःपूर्वक धन्यवाद!!

सौरभ वागळे



ई साहित्य वरील कादंबऱ्या खूप आवडल्या... भयकथा तसेच पाठलाग, शेवटचा साक्षीदार, कामशेत तसेच इतिहासावरील पुस्तके, फकिरा, गुलामगिरी....

विशेष म्हणजे डिटेक्टिव्ह अल्फा सिरिज हे इतके आवडले की रात्री 2 वाजेला फोन करून लेखकाचे अभिनंदन केले तसेच त्याच्या पुढच्या भागाची आतुरतेने वाट बघतोय हे देखील सांगितलं....

**-खासदार उदयन राजे भोसले**

सातारा

Wholeheartedly dedicated to

My MOM & DAD


अल्फाचे पहिले दोन भाग वाचले नाहीत?? खालील लिंक्स तुम्हाला ते डाऊनलोड करण्यास मदत करतील -


डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 1 : रत्नजडित खंजिराचे रहस्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/detective_alpha_saurabh_wagale. pdf

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 2: 'देखावा'

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/detective_alpha_2_saurabh_wagle. pdf



# जुन्या घराचे गूढ

# 1.

जानेवारीचा पहिला आठवडा सुरू झाला आणि तीन तारखेच्या सकाळी मी महिन्याभराच्या हिवाळी सुट्टीनंतर पुन्हा रूमवर परतलो. सकाळचे आठ वाजायला आले होते. सूर्य वरती आला असला तरी वातावरणात बोचरी थंडी होती आणि मला कधी एकदा रुममध्ये जाऊन अंगाभोवती ब्लँकेट लपेटून बसतोय असं झालं होतं. आजपासून आमचं कॉलेज सुरू होणार होतं. एवढ्या लांबलचक सुट्टीनंतर मला कॉलेजला जायचं जिवावरच आलं होतं. म्हणून मी माझा घराचा मुक्काम शक्य होईल तेवढा लांबवला आणि कॉलेज सुरू होण्याच्या सकाळी रूमवर अवतरलो. जिन्याच्या पायऱ्या चढताना मी रूममधील दृश्य कसे असेल, याचा अंदाज बांधण्याचा प्रयत्न केला. सर्वत्र धुळीचे साम्राज्य झालेले असणार होते. रूममध्ये प्रवेशल्यानंतर जळमटं वगैरे डोक्यात पडली नाहीत म्हणजे मिळवली, असा मी विचार केला. कागदाचे बोळे कचरापेटी सोडून सर्वत्र पसरलेले असणार होते. रूममध्ये कुबट वास सुटलेला असणार होता. दाराच्या समोर बेडवर विस्कटलेली

बेडसीट आणि त्यावर अस्ताव्यस्त पडलेलं ब्लँकेट दिसणार होतं. आणि, पलीकडच्या खुर्चीवर पाय लांब करून बसून वरती शून्यात पाहणारा माझा जिवलग रूममेट अल्फा माझ्या दृष्टीस पडणार होता.

मी दार ढकललं आणि रूममधील दृश्य पाहून चकितच झालो!!

रूम कधी नव्हती इतकी चकाचक वाटत होती. सर्व जागच्या जागी अगदी व्यवस्थित रचून ठेवले होते. धुळीचा कुठे लवलेशही नव्हता. सर्व झाडून पुसून साफ केलेले दिसत होते. कचराकुंडी जागच्या जागी होती आणि त्यातला कचराही जागच्या जागी होता. बेडवरती बेडसीट नीटनेटकी अंथरली होती. रूममधील खुर्ची टेबलापाशी ओढून घेतली होती आणि त्यावर महाशय विराजमान होते. खूप दिवसांनी अल्फाला पाहून मला बरे वाटले. त्याचा टेबलाशेजारी बसून काहीतरी वेगळाच उद्योग चालला होता.

टेबलावरती इस्त्री बटण सुरू करून उभी करून ठेवली होती. शेजारीच एक मेणबत्ती पेटत होती. त्याच्या बाजूला एक अगरबत्ती रोवून ठेवली होती. टेबलावर काळया रंगाची चादर पसरून ठेवली होती. त्या लगतच्या खुर्चीत अल्फा बसला होता. अंगावर स्वेटर आणि त्यावरती शाल लपेटली होती. हातात नेहमीचे बॉलपेन होते. समोर एक पुस्तक उघडले होते आणि एका कच्च्या कागदावर तो कसलीतरी आकडेमोड करत होता. त्याचा हा पसारा पाहून मी चाटच पडलो आणि दरवाजातच मिनिटभर उभा राहून ते दृश्य पहात राहिलो.

“ये ना रे आत. की माझ्या आमंत्रणाची वाट पाहतोयस??” अल्फाने माझ्याकडे न पाहताच म्हटले.

“नाही. कुठल्या भलत्याच रूममध्ये आलोय अशी शंका आली म्हणून थबकलो.” मी सँडल काढून ठेवत म्हणालो.

“माहितीये मला, माझी खोली एवढी स्वच्छ असलेली पहायची सवय नाही तुला. पण कधीकधी उन्हातही पाऊस पडतोच की.. तसंही मला फार काही करायचं नव्हतं. फक्त दोन चार वस्तू उचलून ठिकठाक दिसतील अशा लावायच्या होत्या. लहर आली आणि करून टाकलं मग.”

“अशी लहर रोज का बरं येत नाही?? आणि हे सगळं काय मांडून ठेवलं आहेस?? प्लँचेट वगैरे करत नाहीयेस ना सकाळ सकाळी?? मेणबत्ती पेटवून..”

“छे छे.. भुता-बितावर माझा काही विश्वास नाही. आणि आपल्याला छळणारी भुतं काय कमी आहेत? पेपरला शून्य मार्क देणाऱ्या कॉलेजच्या मास्तरापासून रूमच्या भाड्यासाठी टुमणे लावणाऱ्या  घरमालकापर्यंत भुतंच भुतं आहेत सगळीकडे. त्यामुळे मेणबत्त्या पेटवून आणखी भुते बोलाविण्याइतका हौशी नाहीये मी.”

“मग हा पसारा कसला म्हणायचा?? आणि बरं, या मेणबत्त्या, काळी चादर या सर्वांपेक्षा जास्त विचित्र म्हणजे तुझ्यासमोर उघडलेलं पुस्तक आणि तुझ्या हातातलं पेन दिसतंय मला. आता कृपया तू अभ्यास करायला बसला आहेस असं सांगू नकोस. मला ते मुळीच झेपणार नाही.”

अल्फा हसला.

“खरा मित्र शोभतोस बघ प्रभू. हिवाळ्याच्या एका थंडगार सकाळी, सर्वत्र झोपेचे वातावरण असताना अल्फासारखा माणूस पुस्तक घेऊन अभ्यासाला बसणे शक्य नाही, याबद्दल इतकी खात्री आहे तुला??” त्याने त्याच्या समोरचे पुस्तक मला दाखविले.

“ॲप्टीट्यूड??” मी आश्चर्याने विचारले, “ बुद्धीमत्ता चाचणीची पुस्तके सोडवायला लागलायस का तू आता??”

“हो. तू नव्हतास तेव्हा हेच केलंय मी महिनाभर.” अल्फा म्हणाला, “बघ ना. रुममध्ये कोणी नसल्यामुळे माझं तोंड बंद पडलं. त्यामुळे बोलण्यासाठी करावी लागणारी विचाराची प्रक्रिया बंद पडली. अभ्यास नसल्यामुळे हाताचं आणि डोळ्यांचं काम कमी झालं. त्यामुळे मेंदूची गती आणखीच मंद झाली. त्यातच डोक्याला ताण येईल अशी कोणती केसही मिळाली नाही बरेच दिवस. त्यामुळे आणखीनच सुस्ती. तुला माहितीये का प्रभू, मेंदू विचार कसा करतो?? मेंदूमध्ये न्यूरॉन्स नावाचे घटक असतात जे माहिती वाहून नेण्याचे काम करतात. जेव्हा विचार करण्याची प्रक्रिया होते, तेव्हा ते विशिष्ट प्रकारच्या लहरी उत्सर्जित करतात. त्यांना 'स्पाईक्स' असे म्हणतात. या लहरींची एकमेकांशी अन्योन्यक्रिया होऊन त्यातून जे आऊटपुट निघतं, ते म्हणजे आपले विचार. आता माझ्या मेंदूला काम असलं, तरच हे न्यूरॉन्सही काम करतील ना. मी काहीच न करता नुसता बसून राहिलो असतो, तर माझ्या न्युरॉन्सची लहरी उत्सर्जित करण्याची क्षमताच नाहीशी

होईल, अशी मला भिती वाटते. त्यामुळे मी स्वतःला नेहमी कशात ना कशाततरी गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे बुद्धीमत्तेचे प्रश्न म्हणजे मेंदूला खुराक. मला हे सोडवायला जाम आवडतं. विचार करण्याचे नवे मार्ग मिळतात. सो हा सगळा पसारा. आणि या इस्त्री, मेणबत्तीबद्दल बोलशील, तर हे फक्त मी रुममध्ये उबदार वातावरण बनविण्यासाठी केलेले खटाटोप आहेत. थंडीमुळे अंगाबरोबरच माझी विचार करण्याची प्रक्रियादेखील गोठून जाते बुवा. मी तर इथे शेकोटीच तयार करायची म्हणत होतो, पण म्हटलं, तुला विचारल्याशिवाय रुममध्ये अशी पेटवापेटवी करणं योग्य नाही. बरं, ते उघडलेलं दार लावशील, तर बरं होईल. माझा मेंदू थंडीने पुन्हा बंद पडायला लागलाय."

अल्फाची लांबलचक 'आकाशवाणी' बंद राहण्यासाठी दरवाजा उघडाच ठेवावा असा विचार माझ्या मनात आला. पण बाहेर खरंच खूप थंडी होती. त्यामुळे मी दरवाजा लावून घेतला. माझे सामान आतमधल्या खोलीत व्यवस्थित लावून दिले. गरम पाण्याने हात पाय तोंड धुतले (आमच्या रुममध्ये इलेक्ट्रीक हिटर होता). रूममध्ये थंडी होतीच. त्यामुळे मी उबदार वातावरण निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न करणाऱ्या अल्फाजवळ जाऊन बसलो.

"मग? सुट्टी कशी गेली? फेसबुकवर असायचास लेका दिवसभर आणि मला एकपण मेसेज करावासा वाटला नाही? पोरगी बिरगी पटवली नाहीयेस ना सुट्टीत??" मी खाली बसताच अल्फा माझ्यावर खेकसला.

“छे रे.. माझ्यासारख्या चपटगंजूला कोण पोरगी पटणार!!” मी हसून उद्गारलो, “ मी असंच काहीतरी सर्च करायला इंटरनेट वापरायचो. फेसबुक नव्हतो वापरत फार.”

“अच्छा.” अल्फा मेणबत्तीजवळ आपले तळवे नेत म्हणाला, “ मी जामच बोअर झालो बुवा. पहिले काही दिवस झोपून काढले. पण माझ्या मेंदूची निष्क्रियता हळूहळू मला जाणवायला लागली. मग मी वाघमारे सरांच्या ऑफिसला खेटे घालण्यास सुरुवात केली. काही नवीन केसेस मिळतील, काहीतरी इंटरेस्टिंग पहायला मिळेल अशी माझी अपेक्षा होती. पण त्यांनी मला हाकलूनच लावलं जवळपास. कुठल्यातरी महत्त्वाच्या कामात मी गुंतलेलो आहे आणि मला सध्या तुझ्यासाठी अजिबात वेळ नाहीये असं सांगून दरवेळी घालवून दिलं. मग तर मोठाच पेचप्रसंग माझ्यासमोर निर्माण झाला. शेवटी तुझ्याच कपाटातलं ॲप्टीट्यूडचं पुस्तक काढून बसलो उघडून!!”

“म्हणजे एकूणच तुझी सुट्टी खराब गेली म्हण..” मी सहानुभूतीपर आवाजात म्हणालो. अल्फा नुसता हसला. मी पुन्हा एकदा अल्फाच्या सगळ्या पसाऱ्याकडे पाहिले.

“मला खरोखरीच आपण प्लँचेट करतोय असं वाटायला लागलंय.” मी म्हणालो, “ सुट्टीत वेळ जावा म्हणून तू हा उद्योग का नाही केलास? मस्तपैकी पिशाच्चं मंडळी आली असती तुझ्या सोबतीला.”

“तू लवकर आला नसतास तर मी तेही केलं असतं. पण आता त्याची गरज नाहीये.” अल्फा म्हणाला, “कारण एक जख्ख म्हातारी आत्ता इकडे येऊन आपल्याला समक्ष भुतांची भेट घालण्यास घेऊन जाणारे असं मला वाटतंय.”

मी ते ऐकून नुसताच 'आ' वासला. अल्फा माझ्याकडे पाहून डोळे मिचकावत हसला. आमचं हे संभाषण होतं न होतं, तोच आमच्या रूमच्या दारावर थाप पडली. अल्फा एकदमच घाईने उठला.”चला. हा पसारा आवरायला हवा.”

मी त्याला ते सगळं उचलून ठेवण्यास मदत केली. आमची रूम पुन्हा पहिल्यासारखी झाल्यावर मी रूमचे दार उघडले.

बाहेर एक सत्तरीत असणारी एक वृद्ध महिला उभी होती. तिचे केस लांब आणि पांढरे होते. नाकावर जाड भिंगाचा चश्मा आणि त्यामागून बारीक होणारे डोळे माझ्याकडेच रोखून पाहत होते. कानांवर, त्या कानांच्या मानाने थोडा जास्तच आकार असणारे श्रवणयंत्र बसवले होते. अंगावर एक जुनाट वाटणारी नऊवारी नेसली होती. हातात कधीकाळी वरती रंगीत असलेली, पण आता रंग उडालेली लाकडी काठी होती.

“अलका नावाची कोणी इथे राहते का?” त्यांनी चश्मा सावरत आपल्या कापऱ्या आवाजात विचारले, “ मला इन्स्पेक्टर वाघमारे साहेबांनी पाठवलंय.”

“या पाटीलबाई, तुमचीच वाट पहात होतो आम्ही.”अल्फा आतूनच म्हणाला, “ आणि ते अलका नाही, अल्फा म्हणाले असावेत.”

“बरोबर ठिकाणी पोचलेय का मी? मला काही दिसत नाही बाई नीट. तू कोण आहेस बाजूला हो पाहू..” त्यांनी मला जवळपास ढकललंच, “ कुठे आहे अलका ही?”

“इकडे.” मी म्हणालो , “ आणि त्याचं नाव अलका नाही.. . अल्फा आहे.”

“तुझं नाव अलका आहे?” त्यांनी अल्फाकडे पहात विचारले, “ अगंबाई मला वाटलं अलका म्हणजे मुलगीच आहे. काय नव्हेच!! आजकाल मुलांची नावंपण अलका वगैरे ठेवायला लागलेत होय! बरं असो अलका, मला सांगायचं हे होतं की मला वाघमारेंनी पाठवलंय.”

हा 'अलका' चा जप ऐकून अल्फा जरा वैतागलाच.

“हो ठाऊक आहे मला. त्यांचा मेसेज आला होता तुम्ही येणार म्हणून.”तो म्हणाला, “ आणि मला माझं पुन्हा बारसं व्हावं अशी मुळीच इच्छा नाही. माझं नाव 'अल्फा' आहे, 'अलका' नव्हे!!”

“बरं बाबा. जे काही असेल ते.” त्यांनी माझ्या खुर्चीवर बसकण मारली. मग माझ्याकडे पाहून त्या म्हणाल्या, “ पाणी देतोस का रे पोरा थोडंसं?”

मी त्यांना पाणी दिलं. अल्फाने विचारलं, “ येताना काही त्रास नाही ना झाला?”

“काय म्हणालास?” त्यांनी त्यांचं श्रवणयंत्र व्यवस्थित बसविण्याचा प्रयत्न केला. त्यांना बहुधा कमी ऐकू येत असावं.

"मी म्हटलं, येताना काही त्रास नाही ना झाला?" अल्फाने आवाज वाढवून विचारलं.

"नाही नाही. चालायला - फिरायला तशी मी दणकट आहे. पण ऐकू थोडं कमी येतं आणि डोळ्यांचं पण ऑपरेशन झालं होतं चार वर्षांमागं. त्यामुळे दिसतं पण थोडं कमीच." त्या म्हणाल्या, " मी माझी अडचण घेऊन सकाळी सकाळी पोलीस स्टेशनला आले होते. पण तिथल्या साहेब लोकांना माझं गाऱ्हाणं ऐकायला कुठला आलाय वेळ. मग त्यांनी मला इकडे पाठवून दिलं. तुम्ही मात्र त्यांच्यासारखं करू नका. मला जे वाटतंय ते तुम्हाला सांगते. तुम्हाला वाटेल की ही म्हातारी बाई आहे. हिचं वय झाल्यामुळे ही काहीतरी बरळत असणार. फार गंभीरपणे घ्यायला नको. पण मला माहितीये मला कशा प्रकारचा अनुभव येतोय. जरी मी म्हातारी असले आणि इतर तरण्या लोकांसारखं मला काही कळत नसलं, तरी मी वेडी नाहीये. नजर आणि कान कमकुवत झाले असले तरी अजून काम करताहेत. त्यामुळे माझ्यावर तुम्ही विश्वास ठेवावा, असं मला वाटतं. कारण मला जे वाटतं ते खरं असेल तर काय सांगावं, एखादं मोठं संकट कोसळण्याची शक्यता आहे."

" हं.." आपले हात एकमेकांवर चोळत अल्फा उद्गारला. बऱ्याच दिवसांनी कोणीतरी मदत मागण्यासाठी आलंय, हे पाहून त्याला झालेला आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता, " सांगा तुमची कथा." आजीबाईंनी सांगण्यास सुरूवात केली,

“माझे नाव कमला पाटील. वय वर्षे एकोणसत्तर. माझे लग्न परशुराम पाटील यांच्याशी झाले त्याला आता चोपन्न वर्षे झाली. सासरचं गाव अर्जुनवाड. मिरजेच्या पुढे नरसोबाच्या वाडीला जाताना नदी ओलांडल्यानंतर एक छोटेसेच गाव आहे ते म्हणजे अर्जुनवाड. तेव्हापासून आजतागायत मी त्याच गावात राहिले आहे. माझे धनी गावचे पाटील होते आणि गावात त्यांना चांगला मान होता. आम्हाला एकच मुलगा होता. तो तरणाताठा असताना अपघातात गेला. त्याला आता जवळपास पंधरा वर्षे झाली. तेव्हापासून आम्ही दोघेच आमच्या गावातल्या घरात दिवस काढत होतो. ह्यांचे साधारण तीन वर्षांपूर्वी वृद्धापकाळाने निधन झाले. गेली तीन वर्षे मी एकटीच त्या बंगलीत राहतेय. एकटेपणा खूप खायला उठतो पण काही इलाज नाही. परमेश्वराचे बोलावणे येईपर्यंत इथे राहणे भाग आहे. गेली तीन वर्षे मी एकटी रहात असूनही माझ्या घरी कधी चोरी - दरोडे पडले नाहीत की मला कधी कुणा भुताखेताची भीती वाटली नाही. पण गेले तीन दिवस मी फारच अस्वस्थ आणि बेचैन आहे. मला असं वाटतंय की माझ्या घरात माझ्याशिवाय आणखीही कोणीतरी वावरतंय.”

आजीबाईंचे ते शब्द ऐकून माझे डोळे विस्फारले गेले. अल्फाच्या डोळयांत एकदम उत्सुकता दिसू लागली.

“असं का बरं वाटतंय तुम्हाला? मला जरा सविस्तर सांगाल का?” त्याने विचारले.

"मला पहिलं वाटलं की मला भास होतोय. कारण आमचे धनी गेल्यानंतरही मला काही दिवस असंच वाटायचं, की ते माझ्यासोबत आहेत. पण तो भास होता. वर्षानुवर्षे एकत्र राहिल्याने मला तसं वाटत होतं. पण यावेळी असं नाहीये." त्या म्हणाल्या, " माझं जेवण रात्री लवकर आवरतं. साधारण नऊ वाजण्याच्या सुमारास जेवण आवरायचं आणि जपमाळ ओढत बसायचं असा माझा रोजचा कार्यक्रम आहे. माळ ओढून झाली, की साडेदहा वाजता माझी पाठ टेकते. झोप काय लागत नाही पण पडून रहायचे नुसते. त्या रात्री, कधी बरं, हां, शुक्रवारी रात्री नेहमीप्रमाणे माझी माळ ओढून झाली आणि मी माझ्या खोलीत जाऊन बिछान्यावर पडले. रात्रीचे किती वाजले होते कुणास ठाऊक, त्यावेळी मला काहीतरी जोराने आपटल्याचा आवाज आला. सुदैवाने त्या रात्री मी माझे कानातले यंत्र काढून ठेवायला विसरले म्हणून मला तो आवाज ऐकू आला. नाहीतर मला छोटीमोठी खुडबुडसुद्धा ऐकू आली नसती. तो आवाज आल्यामुळे मी दचकून उठले. माझा चश्मा चढवला आणि बॅटरी घेऊन आमच्या घराच्या मागच्या बाजूला जाणाऱ्या पॅसेजमध्ये आले. आमच्या घराच्या मागील बाजूला मोकळी जागा आहे आणि तिथे काही झाडे लावली आहेत. आवारातच एक छोटीशी विहीर आहे. त्यापलीकडे तारेचं कंपाऊंड आहे आणि त्यामागे उसाचे शेत आहे. मी थोड्या धाकधूकीनेच मागचा दरवाजा उघडला. बाहेर किर्र अंधार होता आणि त्यातच माझी दृष्टी अधू. त्यामुळे मला काही दिसले नाही आणि आवाज कशाचा झाला हेपण कळाले नाही. मी आपली पुन्हा दरवाजा लावून आत आले आणि माझ्या जागी पडले. नंतर आवाज झालेच नाहीत की मला ऐकू आले नाहीत देवच जाणे.

त्यानंतरचा दिवस मी थोड्या सावधगिरीनेच आमच्या बंगलीच्या आवारात हिंडत होते. पण दिवसभर कोणी आसपास आहे असं काही मला वाटलं नाही. शिवाय मागच्या शेतात दिवसभर शेतमजूर असतात त्यामुळे थोडी गजबज असते. त्यामुळे मला काय संशयास्पद जाणवलं नाही. दुसऱ्या रात्री मी जरा उशीरापर्यंत जागीच राहिले. माझं कानाचं मशीन मुद्दामच मी कानावर ठेवलं. मी माझ्या खोलीत माझ्या पलंगवरच पडून होते. रात्री खूप उशीरा मला पुन्हा आवाज ऐकू आला आणि यावेळी माझ्या छातीत धस्सच झालं. कारण तो आवाज आमच्या घराच्या बाहेरच्या खोलीतून आला होता. मी चाचपडतच उठले. माझी काठी घेतली आणि आवाज न करता बाहेरच्या खोलीत आले. बाहेर कोणीच नव्हते. मी सगळ्या घरातले दिवे लावले. सावकाश चालत सगळे घर तपासले. पण कोठेच कुणाचा मागमूसही नव्हता. घराला आत येण्यास दोन दरवाजे आहेत - पुढं एक आणि मागं एक. दोन्ही दरवाजे मी तपासले. दोन्ही आतून बंद होते. मला ते पाहून स्वतःवरच शंका यायला लागली. मला खरंच भास होत होता काय? की यामागे अकल्पित अमानवी काही आहे?? मला फारच भीती वाटू लागली. मी आतल्या खोलीत न झोपता बाहेरच्या खोलीतच सोफ्यावर झोपून रात्र काढली. त्या रात्री पुन्हा कसली हालचाल मला जाणवली नाही.

मी पुढच्या दिवशी, म्हणजे काल ही गोष्ट शेजाऱ्या-पाजाऱ्यांना सांगितली त्यांनी तर थेट मला सांगितले की हा काहीतरी भुताटकीचा प्रकार आहे आणि तुम्ही तेथे न राहता दुसरीकडे रहायला जा. पण मी बिचारी एकटी, म्हातारी, अधू. मी अशा अवस्थेत घर सोडून कुठे जाणार. मग मी ठरवलं. काहीपण होऊदे, घर

सोडायचं नाही. काल मी संध्याकाळीच सर्व दारं खिडक्या व्यवस्थित बंद करून घेतल्या आणि त्या बाहेरून उघडता येणार नाहीत, याची खात्री करून घेतली. रात्री जेवण केलं आणि माझ्या नियमानुसार माळ ओढायला बसले. जशीजशी रात्र होऊ लागली, मला वाटणारी भीती हळूहळू वाढू लागली. मी बाहेरच्या खोलीतच बसले आणि काही आवाज येतोय का, यावर बारीक लक्ष ठेवलं. खूप वेळ काही हालचाल नव्हती. पण अखेर रात्री उशिरा ते घडलंच. साधारण दोनच्या सुमारास आमच्या स्वयंपाकघराचा दिवा लागला.. . !!"

अल्फाने खुर्चीवर जवळपास उडीच मारली.

"आतमध्ये कोणी होतं का??" त्याने विचारले, " तुम्ही पाहिलं का??"

"तो दिवा लागला ते पाहून पहिला तर माझ्या काळजाचा नुसता थरकाप उडाला." आजीबाई म्हणाल्या, " मला क्षणभर सुचेचना की मी काय करू. तो माणूस असो वा भूत, मी त्याचं काहीच बिघडवू शकत नव्हते. प्रतिकार करण्यासाठी माझ्याकडे ना शक्ती होती ना कुठलं साधन होतं. मला आतून पावलांचा आवाज येऊ लागला. कोणीतरी आत चालत होतं. मी पाचेक मिनिटं तिथंच खिळून राहिले. रात्रीची वेळ होती आणि अगदी बारीकसं खुट्ट झालं तरी ऐकू येईल इतकी स्मशानशांतता होती. मला वाटलं की तो क्षणभरातच बाहेर येईल आणि माझ्या समोर उभा ठाकेल. हे सगळं एक मिनीटभरच. मग तो आवाज बंद झाला आणि पुन्हा पहिल्यासारखी शांतता पसरली. मी थोडा वेळ वाट पाहिली. आता आतून कसलाच आवाज येईनासा झाला आणि आतमध्ये कोणी आहे असंही वाटेनासं झालं.

शेवटी मीच उठून आतमध्ये जायचं ठरवलं. मी माझी काठी उचलली आणि लटपटत्या पावलांनी मी स्वयंपाकघराकडे चालू लागले. दरवाजापर्यंत पोचल्यावर सावकाशपणे मी आत डोकावून पाहिलं आणि मला धक्काच बसला. स्वयंपाकघर रिकामं होतं!!"

"रिकामं??" मी आश्चर्यचकित होऊन विचारले.

" होय." पाटीलबाई म्हणाल्या, " ते पाहून मात्र माझं उरलंसुरलं अवसानही गळालं. मी धडपडतच माझ्या खोलीत गेले आणि दार आतून बंद करून घेतलं. माझी छाती इतक्या जोराने धडधडत होती की मला वाटलं, आता सगळं संपलं. मी काही राहात नाही. कसंबसं मी स्वतःला शांत केलं. हे काहीतरी वेगळं होतं. शेजारी जे म्हणत होते तेच खरं होतं असं मला वाटायला लागलं. मी भीतभीतच कालची रात्र काढली आणि आज सकाळी उठून पहिल्यांदा पोलीस स्टेशन गाठलं. त्यांना माझी हकिकत सांगण्याचा प्रयत्न केला. पण हे भुताटकी वगैरे ऐकून त्यांनी मला घालवूनच दिलं. त्यांनी मला तुमचा पत्ता दिला आणि तुमचं तुम्ही पाहून घ्या असं सांगितलं. अशा तऱ्हेने मी शेवटी इथवर येऊन पोचले."

"हं.." अल्फाने एक विचारमग्न हुंकार दिला.

"आता इथून कोणाकडे जाण्याचे बळ माझ्यात नाही. तुम्हीच यावर काय करायचं, ते मला सांगा." त्या म्हणाल्या.

"फारच उत्कंठावर्धक कहाणी आहे तुमची." अल्फा म्हणाला, " पहिला तर तुम्ही घाबरून जाऊ नका. तुम्ही सांगितलेल्या हकिकतीवरून मी एवढं तरी

खात्रीपूर्वकपणे सांगू शकतो, की हे जे कोणी आहे त्याच्यापासून तुम्हाला काहीही धोका नाहीये. सरळच आहे. जर त्याला तुम्हाला इजा पोहोचवायची असती, तर त्याने ते काम चुटकीसरशी करून टाकले असते. पण तसा काही आपल्या भूतमहाशयांचा हेतू दिसत नाहीये. बरं, मला एक सांगा, तुमच्या घरावर किंवा घराच्या जागेवर कोणी डोळा ठेवून आहे असं तुम्हाला वाटतंय का? म्हणजे, तुमचे नातेवाईक आणि तुमचे पती यांच्यामध्ये घरासाठी काही वाद होते का??"

"नाही. असं तर काही नव्हतं बाबा. नाहीतर आमचे हे गेल्यानंतरच ज्याला कुणाला घर बळकवायचं होतं त्यानं बळकवलं असतं."

"बरोबर. त्यामुळे हे काहीतरी विचित्र प्रकरण आहे." अल्फा म्हणाला, " आणि कुतूहलजनकसुद्धा. पाटीलबाई, मला या प्रकरणात तुम्हाला मदत करायला आवडेल. मला तुमच्या वाडीमध्ये यावं लागणार असं दिसतंय. हरकत नाही. तसंही आज कॉलेजला जाण्याचा माझा मूड नाहीये. मला तुमच्या घरी येऊन थोडी पाहणी केल्याखेरीज काही अनुमान बांधता येणार नाहीत. प्रभू, मित्रा तुझा आज काय प्लॅन आहे?"

"आज तासभर जाऊन यावे लागणारे कॉलेजमध्ये. नवीन सेमिस्टरसाठी लायब्ररी कार्ड घ्यायचे आहे रे." मी म्हणालो.

"कधीपर्यंत येशील? तुला सोबत घेऊन जायचं आहे." अल्फा म्हणाला. अल्फा साहसात मला सहभागी करून घेऊ इच्छितो, हे पाहून मला आनंद झाला.

"दुपारी तीन वाजेपर्यंत." मी म्हणालो.

"ठिकाय. मग आपण चार वाजता इथून निघू. पाटीलबाई, तुम्ही आत्ता पुढे निघा. तीन दिवसांच्या अनुभवानुसार आपला पाहुणा दिवसाढवळ्या काही तुमच्या घरी उगवत नाही. त्यामुळे तुम्ही बिनधास्त घरी जा. आणि आम्ही येणार याची खात्री बाळगा. आपण तुमच्यासमोर उभं राहिलेलं हे कोडं निश्चितपणे सोडवू याची मी तुम्हाला हमी देतो."

"तुमच्यानं होईल ना हे पोरांनो? तुम्ही कॉलेजला जाणारी कोवळी पोरं दिसताय. त्या अदृश्य होणाऱ्या जादूगारासमोर टिकाव लागेल ना तुमचा? होय बाबा. पहिलाच सगळ्या गोष्टींचा विचार केलेला बरा. नाहीतर तुमच्यासारख्या वीस बावीस वर्षांच्या तरुणांना काही मला संकटात टाकायचे नाहीये." आजींनी आमच्याकडे थोड्या अविश्वासाने पाहत विचारले. अल्फा त्यावर हसला.

"नाही आजी. आम्हाला कोवळे वगैरे काही समजू नका. आम्ही पोलिसांची मदत करतो म्हणूनच त्यांनी तुम्हाला इकडे पाठवले आहे. त्यांना आम्ही काहीतरी करू शकतो असं वाटतं म्हणूनच त्यांनी तुम्हाला आमचं नाव सुचवलं. त्यामुळे तुम्ही निर्धास्त रहा."

"बरं बरं. निघू का मी आता?" त्या काठीचा आधार घेऊन उठल्या.

“हो चालेल.”अल्फाही जागेवरून उठला आणि माझ्याकडे पाहत म्हणाला, “ प्रभू तू आवरून कॉलेजला जा. मी यांना बस स्टॉपवर सोडतो आणि दुसरी दोनतीन कामं करून येतो. तुझ्याकडे किल्ली आहे ना रुमची?”

मी नुसती मान डोलावली.

*

## 2.

दुपारी तीन वाजता आम्ही वाडीच्या गाडीत बसलेलो होतो. आमच्या रूमपासून थेट अर्जुनवाडला जाण्यासाठी वाहन नव्हते. त्यामुळे आम्हाला पहिला आमच्या विश्रामबागमधून मिरजेला जाणारी ऑटो पकडावी लागली. तिथून आम्ही मिरज एसटी स्टँडवर पोचलो. तिथून नरसोबाच्या वाडीला जाणारी बस पकडली. अल्फा मला दरम्यानच्या प्रवासात या प्रकरणाबद्दल त्याने मनात बांधलेले प्राथमिक अंदाज बोलून दाखवेल, अशी माझी अपेक्षा होती. पण सबंध प्रवासात त्याने आजीबाईंच्या कोड्याविषयी चकार शब्दही काढला नाही. त्याऐवजी त्याने तो वेळ या हिवाळ्यातली थंडी गेल्यावर्षीपेक्षा कशी जास्त होती आणि त्याचे उन्हाळ्याच्या उष्णतेवर कसे परिणाम होतील याबद्दल काहीतरी भाकिते करण्यात घालवला. साडेतीनच्या सुमारास आम्ही अर्जुनवाड नावाच्या त्या छोट्या खेडेवजा वाडीत उतरलो. त्या गावाला वेगळे असे बसस्थानक नव्हते. नरसोबाच्या वाडीकडे जाणारा रस्ता त्या गावातून जात होता. तेथे मध्ये एका ठिकाणी बस थांबत होती. अल्फाने पाटीलबाईंनी चिठ्ठीवर खरडून दिलेला पत्ता मोठ्याने वाचला,

“'चावरे मळा, शेवटची गल्ली. पांढऱ्या रंगाचे घर. ' “ तो म्हणाला, “ कोणालातरी विचारावे लागेल.”

आम्ही तेथे कट्ट्यावर बिडीकाडी घेऊन गप्पा ठोकत बसलेल्या म्हाताऱ्यांच्या कळपातल्या एकाला तो पत्ता विचारला. त्याने दाखविलेल्या दिशेने आम्ही चालू लागलो. फारच छोटी वस्ती होती ती. रस्ते अरुंद आणि खाचखळग्यांनी भरलेले होते. रस्ते कसले, पायवाटाच होत्या त्या. आम्ही लोकांना विचारत विचारत अखेर चावरे मळयात येऊन पोहोचलो. त्या वाडीच्या शेवटालाच होता तो भाग. चालत चालत त्या वाटेच्या शेवटी आम्हाला दोन पांढरी घरे दिसली- एक उजव्या बाजूला होते आणि एक डाव्या बाजूला.

“अरेच्चा! इथे तर दोन पांढरी घरे आहेत. यातले आपल्या आजींचे घर कोणते?” मी गोंधळून म्हणालो. घराच्या गेटवर नावाची पाटी नव्हती.

“हे आहे आपल्याला हवे असलेले घर.” डाव्या बाजूच्या घराकडे बोट दाखवित अल्फा म्हणाला, “ उजवीकडचे घर अगदीच टापटीप आणि स्वच्छ दिसतंय. बागेतल्या झाडांची व्यवस्थित काळजी घेतली गेली आहे. शोभेची झाडे आलिकडेच कापून त्यांना आकार दिला गेला आहे. एवढं साफसफाईचं काम एकटी म्हातारी बाई नाही करू शकत. त्याउलट डावीकडचे घर जुनाट, दुर्लक्षित वाटतंय. आवारातील झाडे सुकलेली आहेत. भिंतींवरचा रंग उडालेला आहे. हेच आपल्या आजीबाईंचे घर आहे. चल.”

करकरणारं गेट ढकलून आम्ही आत शिरलो. गेटच्या उजव्या बाजूला तारेचे कुंपण होते. डाव्या बाजूला पाण्याअभावी सुकून पिवळया पडलेल्या गवताचा बगीचा होता. त्याच्या भोवतीने शोभेच्या झाडांचे सुकलेले अवशेष होते. गवतावर पालापाचोळा पसरला होता. समोर पांढऱ्या रंगाचे (पण त्यावर बरेच हिरवट पिवळट डाग पडलेले) घर उभे होते. घरासमोरील जागा तेवढी झाडून स्वच्छ ठेवलेली होती. घराच्या उजव्या बाजुने मागे जाण्यासाठी चिंचोळा रस्ता होता. आम्ही दारापाशी आलो. घरासमोरील पॅसेजला लोखंडी दरवाजा होता आणि लोखंडी ग्रीलने तो पॅसेज बंदिस्त केला होता. आतमध्ये अजून एक दरवाजा होता, जो लाकडी होता. मी लोखंडी दाराची कडी वाजवली(घराला बेल नव्हतीच). सुरुवातीला काहीच प्रत्युत्तर आले नाही.

“थोडंसं जोरात वाजव.” अल्फा म्हणाला. मी जोर लावून कडी वाजवली. आतून पावलांचा आवाज आला. लाकडी दार उघडले गेले आणि आतून काठी टेकत आजीबाई बाहेर आल्या.

“आले आले.” त्यांनी लोखंडी दार उघडले, “ माफ करा बरं का. जरा डोळा लागला होता. या आत.”

आम्ही आत प्रवेश केला.

तसे ऐसपैस होते ते घर. पंचवीस-तीस वर्षांपूर्वीचे बांधकाम असावे. हॉलमध्ये सोफा होता. त्यावरील बसकणींच्या कडांमधून कापूस बाहेर येत होता.

त्यासमोर चहाचे कप वगैरे ठेवण्यासाठी असलेलं छोटं टेबल होतं. समोर जुनापुराणा टिव्ही होता. घरात तसं मोजकंच सामान होतं.

“चहा करू का रे पोरांनो?” आजींनी आपुलकीने विचारले. आम्ही एवढ्या लांबून त्यांच्या घरी आलो, हीच त्यांना खूप मोठी गोष्ट वाटली असावी.

“चहा नंतर घेऊच. पण पाटीलबाई, त्याआधी मला तुमचे चहा बनविण्याचे ठिकाण पहायचे आहे.” इकडेतिकडे न पाहता अल्फाने थेट स्वयंपाकघराचाच रस्ता धरला. आम्ही स्वयंपाकघरात आलो.

ते सर्वसाधारण स्वयंपाकघरापेक्षा लहान असे होते. समोर शेगडीचा कट्टा होता. त्याला लागूनच डाव्या बाजूला देवघर होते. उजव्या बाजूच्या भिंतीमध्ये खिडकी होती आणि त्याच्या बाजूला भांडी ठेवण्यासाठी कप्पे केलेले होते. अल्फाची शोधक नजर संपूर्ण खोलीवरून फिरू लागली. त्याने भिंती चाचपून पाहिल्या. जमिनीची तपासणी केली. फरशा वगैरे उचकटून निघतात का ते पाहिलं. बाजूच्या खिडक्यांवरील पडदे ओढले. खिडकीची नीट तपासणी केली. तिचे दरवाजे बंद करून बळेच उघडता येते का, ते पाहिले. मग खिडकी उघडली. खिडकीच्या आतल्या बाजूने लोखंडी गज असल्यामुळे खिडकी उघडली तरीही बाहेरच्या माणसाला आत येणे शक्य नव्हते. अल्फाने ते गजही चौकटीतून निघतायत का, ते पाहिलं. पण तेही निघाले नाहीत. मग पुन्हा त्याने आजुबाजुला पाहिले. त्या स्वयंपाकघराच्या कोपऱ्यात अजून एक छोटीशी खिडकी होती. व्हेंटीलेशन आणि उजेड येण्यासाठी ती खिडकी केलेली असावी. अल्फा त्या खिडकीकडे वळला.

“ती खिडकी काय वापरत नाही बाई मी.” आजींनी त्या खिडकीकडे पाहून सांगितले, “ उगाच मागच्या शेतातली धूळ सगळी घरात येते.”

अल्फाने काळजीपूर्वक त्या खिडकीचे निरिक्षण केले. त्याच्या पद्धतीने वेगवेगळया अंगांनी तपासून पाहिले.

“ही खिडकी तुम्ही वापरत नाही.” तो म्हणाला, “ पण आपले भूतमहाशय मात्र वापरतात!!”

“म्हणजे??” आजीबाईंचे चष्म्यामागचे डोळे विस्फारले गेले. अल्फाने खिडकीच्या दिशेने बोट दाखविले.

“एक- या खिडकीची कडी खराब झाली आहे. त्यामुळे ही खिडकी बाहेरूनसुद्धा उघडता येते. दोन - याचे जे गज आहेत ते संख्येने जेमतेम तीन आहेत आणि तेही खुपच सैल झालेत. थोडासा प्रयत्न केला, तर ते एका बाजूला सरकवून काढता येतात. आणि तीन - ही खिडकी उघडझाप करण्याचे उद्योग अलिकडेच कोणीतरी केले आहेत हे सरळसरळ दिसतंय. पहा ना.”

मी आणि आजी वाकून पाहू लागलो.

“खिडकीच्या पायथ्याशी आणि दोन्ही बाजूला मध्यभागी धूळ झटकली गेली आहे. बाजूच्या चौकटीवरची धूळ आहे तशीच आहे. याचा अर्थ बाजूला पकडून कोणीतरी आत उडी मारलेली आहे. गज सरकवून बाहेर काढल्याने चौकटीवर ओरखडेदेखील पडले आहेत. ते ओरखडे नीट पहा. ते छिद्रापासून बाहेरच्या बाजूने

गेलेले आहेत. याचा अर्थ ते गज बाहेरूनच कोणीतरी काढलेले आहेत. शिवाय बाहेरून उडी मारून न चढण्याएवढीही खिडकीची उंची नाहीये. त्यामुळे आपल्या पाहुण्यांनी क्षणात अदृश्य होण्यासाठी या खिडकीचा वापर केलेला आहे."

"होय होय. बरोबर म्हणतोयस तू." आजींनी जोराने मान डोलावली.

"तुम्ही त्या रात्री जेव्हा पाहिले, की स्वयंपाकघरात कोणीच नाहीये, तेव्हा तुम्ही या खिडकीकडे नीट लक्ष दिले होते का?" अल्फाने विचारले.

"नाही बाई."

"हं.. घुसखोर तिथूनच बाहेर उतरला असणार."

"पण मला म्हणायचंय, की आजीबाईंच्या घरी रात्री अपरात्री घुसून कोण आणि काय मिळविण्याचा प्रयत्न करतंय? तेही एक नाही तर सलग तीन रात्री?" मी माझ्या मनात घोळत असलेली शंका बोलून दाखवली. अल्फाने त्याच्या हनुवटीखाली असलेली छोटीशी दाढी कुरवाळत विचार केला.

"थोडासा शोध घेतला, तर तेही आपल्याला कळून जाईल, असं मला वाटतं." तो म्हणाला, " त्याआधी मला तुम्हाला काही प्रश्न विचारायचेत पाटीलबाई. मला सांगा, तुमच्या पतींकडे एखादी अनमोल वस्तू होती का? एखादी किंमती वस्तू, जिच्याबद्दल फार कोणाला माहिती नाही आणि जी तुमच्या घरात दडवता येईल अशी?"

आजींनी थोडा विचार केला.

“मला असं नाही वाटत.” त्या म्हणाल्या, “मी जेवढं माझ्या नवऱ्याला ओळखते, त्यावरून तरी असं मला वाटत नाही, की त्यांच्याकडे कोणती मौल्यवान वस्तू असावी. आणि त्यांचं आणि माझं नातं खूपच घनिष्ठ होतं. शेवटपर्यंत आमचं चांगलं पटलं. अशी कोणतीही गोष्ट नाही जी ते मला सांगायचे नाहीत. त्यामुळे त्यांच्या बोलण्यातून तरी आमच्या घरी अशी काही वस्तू असल्याचा उल्लेख कधी झाला नाही.”

“बरं.” अल्फा म्हणाला, “ तुम्हाला असं कधी वाटलं का, की ते घराच्या विशिष्ट एखाद्या भागात जास्त वेळ जा-ये करतायत?”

“नाही बाई.”

“तुम्हाला असं कधी वाटलं का, की ते कधीतरी एकदमच चिंताग्रस्त दिसू लागले आहेत किंवा एकटे एकटे रहायला लागले आहेत?” अल्फा.

“नाही.”

“मरण्याआधी त्यांनी तुम्हाला काही सांगण्याचा प्रयत्न केला होता का?”

“नाही. असं काही झालं नाही.”

“अच्छा. आता थोडं स्पष्टच विचारतो.”अल्फा डोळे बारीक करीत म्हणाला, “ तुम्हाला असं वाटतं का, की तुमचे पती एखाद्या गैरव्यवहारात गुंतलेले होते? त्यांचं कुणाकडे जास्त येणंजाणं होतं का? किंवा कुणाचं तुमच्या घरी येणंजाणं

होतं? त्यांच्या वागण्यातून कधी असं जाणवलं का, की ते सर्वांपासून लपवून काहीतरी करतायत?”

“काहीतरीच काय बोलतोस रे!! माझे धनी म्हणजे एक सज्जन माणूस होता. कोणत्याही प्रकारच्या वाईट कामांमध्ये त्यांचा सहभाग असणं शक्यच नाही. माझ्यावर विश्वास बसत नसेल, तर गावातल्या कुणालापण जाऊन विचार. उलट वाईट मार्गावर असलेल्या लोकांना त्यांनी योग्य दिशा दाखवली. ते असलं उलटसुलट काहीच करू शकत नाहीत.”

“बरं बरं. आतापुरतं इतकं बास आहे. प्रभू, आता आपल्याला थोडे हातपाय हलवायचे आहेत. म्हणजे, शब्दशः हातपाय हलवायचे आहेत. चल माझ्यासोबत बाहेर. पाटीलबाई, आम्ही आता थोडी तपासणी करतो.”

आम्ही बाहेर मोकळ्या हवेत आलो. सूर्य अस्ताला निघाला होता. त्याची तांबूस किरणे घरासमोरच्या शुष्क बगीचावर पसरली होती. वाळून पिवळया पडलेल्या झाडाच्या पानांचा रंग अधिकच गडद झाला होता. मी अल्फाकडे पाहिले. त्याच्या शांत चेहऱ्याकडे पाहून मला रहावले नाही.

“अरे मित्रा, काहीतरी उलगडून बोल!! तुझे विचार कुठल्या दिशेने धावतायत, हे मला थोडं तरी सांगशील का?” मी म्हणालो. अल्फा हसला..

"होय. सध्या माझ्या मनातलं या प्रकरणाबाबतचं चित्र तुझ्यासमोर उघडायला काहीच हरकत नाही." तो म्हणाला, " पण माझ्या एकूण तपासाच्या दिशेवरून तूही काही अंदाज बांधले असशीलच की.."

"अं.. हो. साधारण माझ्या अंदाजाप्रमाणे पाटीलआजींच्या मृत नवऱ्याने घरात काही धनदौलत लपवून ठेवली असावी, असाच संशय तुला येतोय ना? याची कुणालातरी कुणकुण लागली असावी आणि तो असं लपूनछपून येऊन ती संपत्ती लंपास करण्याचा प्रयत्न करत असावा, बरोबर ना?" माझ्या बुद्धीची झेप इथपर्यंतच होती.

"तू कॉलेज टॉपर का आहेस याची कधीकधी प्रचीतीच तू देतोस बघ प्रभू. माझी तर्काची पद्धत तू इतक्या लवकर आत्मसात करशील, अशी माझी अपेक्षा नव्हती." अल्फाने चक्क स्तुतीचे शब्द काढले. (शक्यतो तो माझी निरीक्षणशक्ती कशी कमकुवत आहे, यावरून टोमणे मारायचा), " होय, सध्या तरी मी याच तर्काच्या आधारावर तपासणी करतोय. ते भूत, जादूटोणा वगैरे आपण पहिल्यांदाच बाजूला ठेवू. पाटीलबाई जेव्हा त्यांची कहाणी सांगत होत्या, त्यावेळी मला असं वाटत होतं, की त्यांचं घर हडप करण्यासाठी कोणीतरी त्यांना भीती दाखवून पळवून लावण्याचा प्रयत्न करत आहे. पण हे करण्यासाठी कोणी तीन वर्षे का थांबेल? तो जो कोणी आहे त्याने त्यांचे पती गेल्यानंतर लगेचच हे सगळे उद्योग केले असते. शिवाय पाटीलबाईंनी सांगितले आहेच, की त्यांच्या घरावर हक्क सांगणारं कोणी नाहीये. त्यामुळे हा मार्ग बंद झाला. मग आणखी काय कारण असेल, ज्यामुळे रात्री - अपरात्री एखाद्याने त्यांच्या घरात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला? साहजिकच

पाटलांच्या घरात असे काहीतरी मौल्यवान ठेवलेले आहे, ज्याचा पाटीलबाईंना पत्ताच नाहीये. पण आपल्या घुसखोराला मात्र हे ठाऊक आहे. आजींच्या माहितीपलीकडे पाटलांचे काही व्यवहार असावेत, ज्यातून आलेला पैसा किंवा जी काही मौल्यवान संपत्ती असेल, ती त्यांनी घरातच कुठेतरी दडवून ठेवली असेल. याची माहिती त्यांच्याखेरीज ज्या कोणाला आहे, तोच हे सगळे उद्योग करत असणार."

"पण तरीही आपला पहिला प्रश्न उरतोच." मी विचार करत म्हणालो.

"तो तीन वर्षे का थांबला?" अल्फाने माझ्या मनातला प्रश्न उपस्थित केला, " हं. मलाही हेच कोडे उलगडत नाहीये. शिवाय अजूनही काही धागे आहेत, जे नीटपणे जुळून येत नाहीयेत. आता पहा ना. समज एक घर आहे, जिथे भरपूर संपत्ती दडवून ठेवलेली आहे. ती तुला हस्तगत करायची आहे. त्या घरात एक अधू म्हातारीशिवाय दुसरे कोणीही रहात नाही. अशा वेळी तू काय करशील? सरळ एका रात्री तू येशील, म्हातारीला बंदूकीचा धाक दाखवून डांबून ठेवशील आणि संपूर्ण घरभर शोधाशोध करून तुला हवे ते घेऊन जाशील. पण आपला घुसखोर भलताच गांधीवादी दिसतोय. आजींच्या नकळत ही सर्व शोधाशोध करण्याचे कारण काय?"

असा विचार मी केलाच नव्हता.

"हो. हेही विचित्रच आहे नाही का?" मी म्हणालो, " तो घुसखोर आजींचा जवळचा नातेवाईक किंवा हितचिंतक असावा, असं तर नाही ना?"

“शाबास प्रभू. माझ्या विचारांच्या हातात हात धरणारे विचार कोणी मांडले, तर मला फार आनंद होतो.” अल्फा खुष होऊन म्हणाला, “ सध्या तरी ती एकच शक्यता दिसतेय. पण हे सगळं एवढ्यावरच संपत नाही. आज सकाळी तू कॉलेजला गेल्यानंतर मी मिरज पोलीस ठाण्यात गेलो होतो. तिथे मी परशुराम पाटील यांच्या नावावर काही गुन्हे दाखल झाले होते का, याची चौकशी केली. पण त्यांचं नाव कुठे आढळलं नाही. शिवाय इथे अर्जुनवाडला एक छोटं पोलीस ठाणं आहे तिथे आम्ही फोन लावला होता. त्यांना 'परशुराम पाटलांच्या नावावरचे गुन्हे' ' अशी विचारणा करता पहिला तर ते हसलेच. 'परशुराम पाटील म्हणजे वाडीतला सर्वात सज्जन माणूस होता ' अशा शब्दांत त्यांनी आम्हाला त्यांची ख्याती ऐकवली. गुन्हे तर लांबचीच गोष्ट. मग अशा एका सर्वसामान्य माणसाकडे कुठून येणार एवढी संपत्ती?? या सगळ्याचा एकत्रित विचार करता, आपण पकडलेला रस्ता बरोबर आहे की नाही, याबद्दल मी साशंक आहे. पण हरकत नाही. ते लवकरच स्पष्ट होईल. सध्या आपण एक काम करू. हे घर आणि त्याच्या आजूबाजूचे आवार याचा कानाकोपरा तपासून पाहू. कोणीतरी इतकी जोखीम पत्करून शोध घेतंय, याचा अर्थ काहीतरी इथे दडवून ठेवलेलं असणारच आहे. एकदा का ते आपल्याला मिळालं, की मग सगळं काही अगदी सूर्यप्रकाशासारखं स्पष्ट होईल.”

मी लगेचच त्याला संमती दर्शविली. आम्ही घराच्या मागच्या बाजूने शोध घेण्यास सुरुवात केली. पाटलांच्या या जुनाटशा घरात इतकं काय दडलेलं असावं? पैशांची बंडलं असलेली बॅग? दागिन्यांची पेटी? गुप्त कागदपत्रे?? माझी उत्सुकता

क्षणोक्षणी ताणली जात होती. आम्ही बाहेरचा सगळा परिसर धुंडाळला. पण कुठेच काही दडवले असल्याचे निशाण मिळाले नाही.

“घुसखोराने फारच काळजीपूर्वक हा भाग तपासलेला आहे.” अल्फा म्हणाला, “ इथल्या खुणाच सांगताहेत. आपल्याला जसे इथे काही मिळाले नाहीये, तसेच त्यालाही मिळाले नसणार. नाहीतर त्याने त्याचा मोर्चा घराकडे वळवलाच नसता.”

“घरात खरेच काही सापडण्याची शक्यता आहे का?” मी विचारले. पण अल्फाच्या चेहऱ्यावर मघाशी स्वयंपाकघरात शिरताना जितका आत्मविश्वास दिसत होता, तितका आत्ता माझा प्रश्न ऐकून दिसला नाही. काहीच न बोलता तो घराच्या दिशेने वळला आणि मीही त्याच्या मागे चालू लागलो. घरामध्ये अर्थातच आम्ही स्वयंपाकघराची तपासणी पहिल्यांदा केली. मग हॉल. मग आजीबाईंची खोली. अडगळीची खोली. वरचा माळ. टॉयलेट बाथरूम. घराची इंच न इंच जागा तपासली. पण आमच्या हाती काहीही लागले नाही. आता मात्र अल्फादेखील गोंधळात पडला होता. मी त्याच्या चेहऱ्यावर असे भाव पहिल्यांदाच पहात होतो.

“हे कसे शक्य आहे पण..” तो पुटपुटला, “ काहीतरी असलंच पाहिजे इथे, ज्यासाठी तो घरात घुसतोय..”

“असं नसेल ना, की तो जे काही शोधत होता, ते त्याला मिळालं आणि तो ते काल रात्रीच घेऊन गेला?” मी शंका उपस्थित केली.

“तसं असेल तर किमान आपल्याला ते गुप्त ठिकाण तरी मिळायला हवं होतं. तिथे काहीतरी हलवाहलव केल्याचे निशाण मिळायला हवे होते. पण तसं तर काहीच दिसत नाहीये.” अल्फा म्हणाला, “ खरंतर आपल्याकडे फारच कमी माहिती आहे. त्यामुळे आपण काहीच ठोसपणे सांगू शकत नाही.

मलाही आता काहीच समजेनासं झालं होतं.

“मला वाटतंय की मी या प्रकरणात आतापर्यंत फारच उथळ विचार करून निष्कर्ष काढलेले आहेत.” अल्फा म्हणाला. त्याच्या आवाजात निराशेची छटा स्पष्ट दिसत होती.

“ठिकाय. काही हरकत नाही.” तो इकडेतिकडे पाहत म्हणाला, “ सध्या तरी आपण दोन गोष्टी करायला हव्यात असं मला वाटतं. पहिली गोष्ट म्हणजे, आजची रात्र आपल्याला इथंच काढायची आहे. याचे कारण म्हणजे, आज रात्रीही घुसखोराने काहीतरी हालचाल करण्याचा प्रयत्न केला, तर त्याला आपण रंगेहाथ पकडू शकू. आणि शिवाय, पाटीलबाईंना रात्री या घरात एकटेच सोडून जाणे मला पर्याप्त वाटत नाही.”

त्याने माझ्या सहमतीसाठी माझ्याकडे रोखून पाहिले.

“मंजूर.” मी विनातक्रार सहमती दर्शवली. ते ऐकून त्याचा चेहरा जरा उजळला.

“गुड.” तो म्हणाला, “ आणि दुसरी गोष्ट म्हणजे, मला आता थोडा एकांत हवाय. मी थोडं बाहेर वाडीत फिरुन येतो. या प्रकरणाचा मला पुन्हा एकदा अगदी सुरुवातीपासून विचार करावा लागणार आहे, असं दिसतंय. तू इथंच आजींसोबत इथेच थांब. आणि थोडं सतर्क रहा. मी येतोच तास-दोन तासांत.”

“ओके.” मी घड्याळात पाहिले. साडेसात वाजत आले होते. बाहेर बराच अंधार पडला होता. हळूहळू वातावरणात थंडी पडू लागली होती. आम्ही बाहेरच्या खोलीत आलो. आजीबाई हॉलमधल्या देवदेवतांच्या जुन्यापुराण्या फोटोंसमोर दिवे ओवाळत होत्या.

“पाटीलबाई, आजची रात्र आम्ही दोघे इथंच मुक्काम ठोकणार आहोत. तुमची काही हरकत नाही ना??” अल्फाने विचारले.

“काय सांगता!! देवच पावला म्हणायचा बाई.. माझ्या मनातही अगदी हेच होते. ते तुम्हाला कसे बोलून दाखवावे, हेच मला कळत नव्हते. तुम्हा पोरांना इथे रहायला आवडेल की नाही, असं मला वाटत होतं. पण मी आणखी एक रात्रसुद्धा इथे एकटी राहू इच्छित नाही. तुम्ही मोकळेपणाने रहा इथे. या घराला आपलंच घर समजा.” आम्ही त्यांच्या सोबतीला थांबणार, हे ऐकून आजींचा जीव भांड्यात पडला.

“मी येतो.”अल्फा निरोप घेत म्हणाला, “ तुझ्याकडे हेडफोन्स आहेत का प्रभू?”

अल्फा त्याच्या मनातील खळबळ शांत करायला गाणी ऐकायचा, हे मला ठाऊक होतं. पण दुर्दैवाने माझ्याकडे हेडफोन्स नव्हते. मी नकारार्थी मान डोलावली. अल्फाने एक सुस्कारा सोडला आणि तो बाहेर पडला. मी व्हरांड्यात उभा राहून अंधारात चालणाऱ्या त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिलो.

*

# 3.

रात्रीचे साडेनऊ वाजले. जसाजसा वेळ उलटत होता, तशीतशी त्या घराच्या आजुबाजुची शांतता अधिकच गहन होत चालली होती. बाहेर कडाक्याची थंडी पडली होती. मी हॉलमधल्या जुन्यापुराण्या सोफ्यावर हातापायांची घडी घालून आखडून बसलो होतो. खूप वेळ निष्क्रिय बसल्यामुळे मला जाम वैताग आला होता आणि थोडी थोडी झोपही यायला लागली होती. आजी बसल्या बसल्या जपमाळ ओढत होत्या. शेवटी मी हताशपणे उठलो आणि हॉलमध्ये येरझाऱ्या मारू लागलो. नक्की काय असावी ही भानगड? या जुनाट पोपडे उडालेल्या वास्तूमध्ये काय पुरून ठेवलेलं असावं?? आणि ते आजींच्या केसालाही धक्का न लावता हस्तगत करण्याचा प्रयत्न करणारा विचित्र घुसखोर कोण असेल?? मी थोडा विचार केला. तो आजीबाईंचा नातेवाईक असावा कदाचित.. त्याशिवाय एवढा दयाळूपणा कोणी दाखवला नसता. अल्फा आजीबाईंच्या नातेवाईकांपासूनच का सुरूवात करत नाहीये? माझ्या मनात विचार चमकून गेला. आणि मग तो जे काही शोधत होता, ते

नक्की होतं कुठे? आम्ही तर सगळं घर पालथं घातलं होतं. असंही असू शकतं, की त्याला हवं ते मिळालंही असावं!! तो जे काही असेल ते उचलून घेऊन गेला असला, तर साहजिकच आमच्या हातात काही पडणार नव्हतं. तसं असेल, तर मग पुढे काय करायचं?? माझी विचारशृंखला तिथून पुढे जाईनाशी झाली. डोळ्यांवर पट्टी बांधून कोणीतरी अंधारात सोडून द्यावं, अशी आमची गत झाली होती.

दहा वाजायला आले. आता माझ्या मनाच्या एका कोपऱ्यात कुठेतरी थोडी थोडी भीती उत्पन्न होत होती. घुसखोराला ठाऊक असेल का, की आजींसोबत त्यांच्या घरात आज आम्ही दोघेही आहोत ते? अल्फा यायच्या आत कोणीतरी घरात घुसण्याचा प्रयत्न केला, तर माझी चांगलीच पाचावर धारण बसणार होती. भलेही नियमितपणे जिमला जाऊन माझे बाहू चांगलेच बळकट झाले होते, पण कोणाशी हातापायी करण्याचा प्रसंग माझ्यावर कधी आला नव्हता. अल्फा लवकरात लवकर यावा अशीच मी प्रार्थना केली. अखेर सव्वादहाच्या सुमारास तो परत आला. मघाशी अगदीच मलूल झालेल्या त्याच्या चेहऱ्यावर आता थोडं तेज दिसत होतं.

“काय झालं? काही..”तो आत येताच मी उत्सुकतेने विचारले. पण त्याने मला मध्येच तोडले.

“श् श् श्..”तो तोंडावर बोट ठेवत म्हणाला, “ आपण आता आपला आवाज या खोलीच्या बाहेर जाणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. जर घुसखोराला कळाले, की आजींसोबत घरात कोणीतरी आहे, तर आज तो इकडे फिरकणारच

नाही. ते जाऊदे. मला सांगा, या घरात काही खायला आहे का? मला सणकून भूक लागलीये."

"हो तर. तुझी वाट पाहून आम्ही जेवून घेतलं बाबा." आजी म्हणाल्या, " आणू का तुला जेवायला?"

"धन्यवाद." अल्फा म्हणाला. तो हात धुवून आला आणि माझ्या बाजूला सोफ्यावर त्याने बसकण मारली.

"फारच बोअर झालो बुवा." मी म्हणालो.

"सॉरी. माझ्याकडे काहीच पर्याय नव्हता." अल्फा हसून म्हणाला, "मी गावकऱ्यांशी गप्पा मारायला बाहेर पडलो होतो. माझ्यासोबत तू असतास, तर त्यांना संशय आला असता. शिवाय आजींसोबत कोणालातरी थांबायला हवेच होते."

आजींनी जेवणाचे ताट अल्फाला आणून दिले.

"सावकाश जेव रे पोरा." त्या म्हणाल्या. अल्फाच्या डोळयांत क्षणभर कृतज्ञतेची भावना प्रकट झाली. पुढच्याच क्षणी तो जेवणावर तुटून पडला. मला त्याच्या जेवणात व्यत्यय आणायची इच्छा नव्हती. पण मला शांतही बसवेना.

"काही नवीन कळालं??"मी विचारले. त्याने नकारार्थी मान हलवली.

"एवढंच कळालं, की आपण याआधी चुकीच्या मार्गावरून जात होतो." अल्फा तोंडात भाकरीचा घास कोंबत म्हणाला, " पाटील एक सरळमार्गी माणूस होता आणि दडवून ठेवावी अशी कोणतीच धनदौलत त्यांच्याकडे नव्हती."

"तसे असेल, तर दुसरी काय शक्यता आहे?"

"हे जे काही दडवलेलं आहे, ते पाटलांनी दडवलेलंच नाहीये." अल्फा उद्गारला.

"मग? त्यांनी नाही तर कोणी?" मी भुवया उंचावल्या.

"सध्या तरी असं समज, की पाटलांच्या पश्चात कोणीतरी तिसऱ्यानेच इथे काहीतरी दडवून ठेवलंय आणि आता त्याचा शोध घेणारा कोणीतरी चौथाच आहे." अल्फा म्हणाला. मी काहीच न कळून त्याच्याकडे पाहत राहिलो.

"हे प्रकरण दिसतेय तसे साधे मुळीच नाहीये प्रभू. काहीतरी मोठा घोटाळा आहे याच्यामागे असं दिसतंय." त्याने जेवण आवरले आणि हात धुवून परत हॉलमध्ये आला.

"पाटीलबाई मला सांगा, हे सगळे प्रकार कधीपासून सुरू झालेत??" त्याने आजींना विचारले.

"अं.. आजपासून तीन दिवस आधी. म्हणजे शुक्रवारी."

“हं, म्हणजे डिसेंबरच्या एकतीस तारखेला.” अल्फा विचारपूर्वक म्हणाला, “ गुड. बरं, तुम्ही पेपर वाचता का?”

“हो. वाचते ना.”

“तुमच्याकडे गेल्या आठवड्यातले पेपर आहेत का?”

“हो, तिथे वरती ठेवले असतील पहा.” आजींनी वरच्या लॉफ्टकडे बोट दाखविले. अल्फाने वरती ठेवलेल्या वर्तमानपत्रांचा गठ्ठा खाली काढला आणि खाली अंथरलेल्या चटईवर टाकला.

“तो आजही रात्री येणार असं वाटतंय का तुम्हाला?” आजींनी बावरून विचारले.

“ठाऊक नाही पाटीलबाई.” अल्फा सुस्कारा सोडत म्हणाला, “ त्याला जे हवंय ते अजूनही मिळालं नाही, असंच आपण गृहीत धरून चालतोय. तसं असेल, तर तो नक्की पुन्हा येईल. पण त्याला हवी असलेली वस्तू जर मिळाली असेल, तर आपले सगळेच मुसळ केरात गेलेत असं म्हणायला हरकत नाही.”

तिथे मिनिटभर शांतता पसरली.

“ठिकाय..” हातांवर हात चोळत तो म्हणाला, “ बी पॉझिटिव्ह.. आपला अनाहूत पाहुणा जर आलाच, तर कदाचित रात्री उशिरा येईल. तुम्ही झोपला तरी हरकत नाही. पण आवाज मुळीच करू नका. लाईट बंद करून टाकू, म्हणजे आजी झोपल्या, असे त्याला वाटेल.”

“आणि तू काय करणारेस?” मी त्या पेपर्सच्या गठ्ठ्याकडे आणि अल्फाकडे आळीपाळीने पाहत विचारले.

“मी मस्त पेपर वाचत बसणारे!!” अल्फाने घोषित केले.

माझ्या चेहऱ्यावर असलेलं छोटसं प्रश्नचिन्ह अल्फाचा हा कार्यक्रम पाहून भलंमोठं होऊन बसलं. त्याने माझ्या चेहऱ्यावरचे भाव ओळखले.

“आय नो, आय नो. खरंतर मी नक्की काय विचार करतोय, हे तुला सांगायला हवं.” अल्फा स्मितहास्य करीत म्हणाला, “ पण मीच अजून अंधारात आहे. माझ्या मनात फक्त एक पुसटशी कल्पना आलीये आणि ती कितपत योग्य असेल, याचा एक टक्काही अंदाज मला नाहीये. पण आता तेवढीच शक्यता आपल्यासमोर शिल्लक आहे आणि बाकी शक्यता जर खोट्या असतील, तर ती बरोबर असायलाच हवी. शिवाय आपल्याकडे वेळ फारच कमी आहे. तुला सांगत बसलो तर त्यात बराच वेळ जाईल. त्यामुळे तू थोडी विश्रांती घे. मी एकेक काम करायला सुरुवात करतो. सगळं स्पष्ट झालं की तुला सविस्तर सांगेन की ही भानगड नक्की काय आहे ते. फक्त मला याची संपूर्ण शहानिशा करू दे.”

“बरं..” मी हताशपणे उद्गारलो. अल्फाचा हा स्वभाव मला काही नवीन नव्हता. संपूर्ण माहिती असल्याशिवाय तो मला त्याच्या मनातलं तसूभरही काही सांगायचा नाही. त्यामुळे मी खांदे उडविले आणि माझा मोबाईल उघडून बसलो.

अल्फाने दिवे बंद केले आणि मोबाईलचा फ्लॅश सुरू केला. मग त्याने पेपरच्या गठ्ठ्याशेजारी येऊन बसकण मारली आणि वरील दोनतीन पेपर बाजूला

ठेवून त्याखालचे पेपर काळजीपूर्वक वाचू लागला. अकरा वाजून गेले होते. मी मोबाईलवर एक मॅथेमॅटीक्सचं एक डॉक्युमेंट उघडून वाचत बसलो. थंडीमुळे माझ्या हालचाली मंदावल्या होत्या. डोळ्यांवर झापड येत होती. त्याउलट अल्फा मात्र उत्साहाने आणि बारकाईने पेपरमधल्या रकान्यांवरून नजर फिरवित होता. फ्लॅशच्या अंधुक प्रकाशात त्याच्या हालचाली मला दिसत होत्या. आजी बाजुच्या सोफ्यावर बसून पेंगत होत्या. वातावरणात इतकी शांतता होती, की अगदी पेपरची पाने पलटण्याचा आवाजही ढोल बनविण्याच्या आवाजाइतका मोठा वाटत होता. मधून मधून वाऱ्याच्या झुळुकेचा आणि त्याबरोबर मागच्या शेतात सळसळणाऱ्या उसाच्या पात्यांचा आवाज येत होता. मला आजीबाईंचे अप्रूप वाटले. अशा ठिकाणी त्या एकट्या कशा काय राहत असतील?

पंधरा मिनिटे झाली आणि एकदम आम्हाला कोणीतरी टाळी वाजविल्याचा आवाज ऐकू आला. मी दचकून आजुबाजुला पाहिले.

“येस.. !! देअर यू गो अल्फा!!” तो अल्फाच होता. आम्ही त्याच्याकडे बघत असलेले पाहून त्याने जीभ चावली.

“सॉरी.. नकळत जरा जास्तच जोरात बोललो मी..” तो म्हणाला.

“काय झालं? आला का तो??” आजी एकदम घाबऱ्याघुबऱ्या होत म्हणाल्या.

“नाही नाही, पाटीलबाई.” अल्फा आपला मोबाईल हलवत म्हणाला, “मीच आहे. काळजी करू नका. मला आता अगदी प्रकर्षाने वाटायला लागलंय, की

माझी शंका अगदी बरोबर आहे. ओके.. आता मला झपाझप हातपाय हलवावे लागणारेत. मी एक काम करतो. मी आता आतमध्ये जाऊन एक दोन फोन करतो. म्हणजे अचूकपणे काहीतरी ठरवता येईल. तुम्ही असेच बसून रहा. आवाज करू नका.”

त्याने पेपरचा गठ्ठा होता तसा वरती ठेवून दिला आणि तो आवाज न करता आतमध्ये गेला. त्याच्या मोबाईलचा फ्लॅश बंद झाल्यामुळे हॉलमध्ये अंधार पसरला. मी आजींकडे पाहिले. त्याही माझ्याकडे पाहत होत्या. मला खात्री होती, की माझ्या चेहऱ्यावर जे भाव होते, तेच त्यांच्या चेहऱ्यावरही असणार होते. आम्हाला आतून हलक्या कुजबुजण्याचा आवाज आला. तो आवाज साधारण तीन ते चार मिनिटे येत होता. मग तो थांबला. अल्फा आतल्या खोलीतून बाहेर आला आणि हॉलमध्ये येरझाऱ्या मारू लागला. हे आणखी दहा मिनिटं चाललं. मग त्याचा फोन व्हायब्रेट होऊ लागला. तो लगबगीने आत गेला आणि कुजबुज पुन्हा सुरू झाली. अल्फा ज्या गतीने ते सर्व करीत होता, ते पाहून मला खात्री झाली, की आज रात्री आपल्याला काहीतरी नाट्यमय पहायला मिळणार आहे. तो शक्य तितक्या लवकर या प्रकरणाचा रहस्यभेद करण्याच्या मागे होता. त्याच्या हालचालीच सांगत होत्या. फार काळ आपल्याला कोड्यात रहावे लागणार नाहीये, हा विचार मनात येताच मी सुखावलो.

पाचेक मिनिटांनी तो बाहेर आला आणि माझ्या बाजूला येऊन बसला. मला त्याच्या चेहऱ्यावरील भाव त्या अंधुक प्रकाशात दिसत नव्हते ; पण त्याच्या

श्वासोच्छवासांच्या वेगावरून मी नक्की सांगू शकत होतो, की तो खूपच उत्तेजित झाला होता. त्याला हवा असलेला धागा त्याला गवसला होता.

“खूपच महत्त्वाची माहिती मिळालीये तुला. हो ना?” मी अधीरपणे त्याला विचारले,” प्रकरण आता संपण्याच्या मार्गावर आहे, असं एकूण तुझ्या हालचालींवरून मला वाटतंय.”

“ नव्वद टक्के मला हवं ते मी मिळवलंय. पण एक गोष्ट अजूनही अशी आहे, जी मला या शृंखलेत बसवता येत नाहीये.” त्याच्या आवाजात जितका उत्साह होता, तितकीच बेचैनीही होती.

“ओह नो.. !! म्हणजे तू आत्ता मला काहीच खुलासा करणार नाहीयेस?” मी हळहळत विचारले.

“नाही. थोडं थांब प्रभू. मला जरासा विचार करू दे.. मी पोहोचलोच आहे जवळपास..” अल्फा पुन्हा येरझाऱ्या घालू लागला. आजी बिचाऱ्या मघापासून आम्हा दोघांकडे आळीपाळीने टकामका बघत होत्या. मी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले आणि अल्फा काय करतोय, हे पाहू लागलो.

“प्रभू, तुला नक्की खात्री आहे का, की आपल्याला इथे शोधताना एखादी लपविण्याची जागा अथवा कुठेतरी काहीतरी लपविल्याचे निशाण मिळाले नाहीत??” त्याने मधुनच विचारले.

“निश्चितपणे नाही.” मी उत्तरलो.

“हं..” तो चालता चालता हुंकारला. तो कुठे अडला होता, याचा मला अंदाज करता येत नव्हता. कदाचित मी त्याला काही मदत करू शकलो असतो. पण विचारुनही तो सांगणार नाही, याची मला खात्री होती.

एकदमच चालता चालता तो थबकला. मग अलगदपणे पावले टाकत तो दरवाजाच्या बाजुच्या खिडकीपाशी आला. खिडकीचे पडदे लावले होते.

“मला ठाऊक आहे, की खिडकीचा पडदा या क्षणी सरकवायला नाही पाहिजे. बाहेर आपल्या हालचाली दिसण्याची शक्यता आहे. पण मला एका सेकंदासाठी फक्त खात्री करून घ्यायची आहे.” तो पुटपुटला आणि सावकाशपणे त्याने खिडकीचा पडदा बाजूला सारून बाहेर काहीतरी पाहिले. पुढच्याच क्षणी त्याने तो पडदा झटकन लावला आणि पुन्हा माझ्या शेजारी येऊन बसला. त्याच्या अंगातून उत्साहाच्या लहरी बाहेर पडत असल्याचं मला जाणवलं.

“प्रभू, हे प्रकरण निकालात निघाल्यानंतर तू एक काम कर. माझ्या डोक्यात एक जोरात टपली हाण!!” अल्फा म्हणाला.

“का? काय झालं?” मी स्तिमित होऊन विचारले.

“माझा मठ्ठ मेंदू!! साध्या साध्या गोष्टी नजरेआड केल्यामुळे इतका वेळ हे प्रकरण ताणलं गेलं. मी हा विचार पहिलाच केला असता, तर आपण हा विषय संपवून रात्रीच्या जेवणासाठी सांगलीत परतलो असतो. पण असो. देर आये, दुरुस्त आये!! आता या नाट्याचा शेवटचा अंक सुरू होणार आहे. आत्ता मला सर्व

सांगण्याचा आग्रह करू नकोस. फक्त मी काय सांगतो ते लक्षपूर्वक ऐक आणि माझ्या सूचना पाळ. आपल्याला आता बाहेर पडावे लागणार आहे.”

“आत्ता? या वेळी??” मला ते ऐकून धक्काच बसला.

“श् श् श्..” त्याने मला चूप केले, “ होय. आपल्याला आपल्या पाहुण्याचे स्वागत बाहेर जाऊन करावे लागणार आहे.”

“तो खरंच येणार आहे का? तुला खात्री आहे का??”

“होय!!” अल्फा ठासून म्हणाला, “आणि आता प्रश्न विचारू नकोस. कदाचित तो सहजरीत्या आपल्याला सापडेल. कदाचित हाणामारीही होण्याची शक्यता आहे. मला तुझी मदत लागेल. फक्त गडबडून जाऊ नकोस आणि घाबरू नकोस. माझ्या अंदाजाप्रमाणे तो आपल्याला इजा पोहोचवणार नाही; पण पळून जाण्याचा प्रयत्न मात्र निश्चित करेल. त्याला फक्त अडवून ठेवायचं आहे. समजलं?”

अल्फा ते सांगत असतानाच माझ्या छातीच्या ठोक्यांचा वेग हळूहळू वाढत असल्याचे मला जाणवले. अल्फाने खिडकीतून असे काय पाहिले , ज्यामुळे त्याने बाहेर पडण्याची तयारी सुरू केली, ते मला कळेना. हे सगळं मला एखाद्या ॲडव्हेंचर स्टोरीसारखं वाटू लागलं होतं. मी होकार म्हणून फक्त मान हलवली. आमचं बोलणं ऐकून आजीबाई मात्र एकदम बावचळून गेल्या होत्या.

“क्.. कुठे निघाला आहात??” त्यांनी विचारले.

“पाटीलबाई आम्ही थोड्या वेळात तुम्ही निश्चिंत रहा. आम्ही सहीसलामत परत येऊ. तुम्ही आतून दरवाजा लावून घ्या. आम्ही थोड्या वेळात येतो.”

“अं.. बरं बरं.. सांभाळून रे बाबांनो.. !!” त्यांच्या आवाजात भीती स्पष्ट दिसत होती.

अल्फाने हळूवार दरवाजा उघडला आणि बाहेरचा अंदाज घेतला. दरवाजा उघडताक्षणीच थंडीची एक लाट आतमध्ये शिरली. माझ्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला.

“आपल्याला जराही आवाज होणार नाही, याची खबरदारी घ्यावी लागणार आहे प्रभू. तू माझ्या मागे चालत रहा. कान आणि डोळे उघडे ठेव.” तो माझ्याकडे वळून पुटपुटला. आम्ही दरवाजा बंद केला आणि अलगदपणे पावले टाकत बाहेर पडलो.

चोहीकडे काळाकुट्ट अंधार होता. रस्त्यांवर दिवे नसल्यामुळे संपूर्ण परिसर अंधारात बुडालेला होता. आजुबाजुला असलेल्या वस्तूंच्या केवळ आकृत्या दिसत होत्या. अल्फाने मला आवाज न करता त्याच्या पाठीमागे येण्याची खूण केल्याचे मला जाणवले. आता तो मला कुठे घेऊन चालला होता, याचा मला काहीच अंदाज येत नव्हता. माझ्या सर्वांगाला कापरं भरलं होतं. पण ते थंडीमुळे होतं की समोर उभ्या ठाकलेल्या भीतीमुळे होतं, हे मात्र मला ठरविता आलं नाही.

अल्फाने हळूवारपणे गेट उघडले आणि आम्ही घराच्या आवारातून बाहेर पडलो. अल्फा काळजीपूर्वक पावले टाकत रस्त्यावर चालू लागला. क्षणातच आम्ही

रस्ता ओलांडला आणि आजींच्या घरासमोर असलेल्या घराच्या गेटसमोर येऊन उभारलो. गेट आतून कुलूप लावून बंद केले होते.

“आपल्याला आत जायचंय.” अल्फा कुजबुजला. मी आजुबाजूला पाहून अंदाज घेतला. आवाराच्या भिंती उंच होत्या, पण थोडा प्रयत्न केल्यास त्यांवर चढून जाणे शक्य होते. मी त्या भिंतीकडे इशारा केला. आम्ही तिथे गेलो.

“मी आधी चढतो मग तुला हात देतो.” मी त्याला सांगितले. मी अल्फापेक्षा उंच असल्याने मला भिंतीवर चढणे सहज शक्य होते.

“ठिकाय. पण आवाज न करता.” त्याने मला बजावले. मी झपकन भिंतीवर चढलो आणि आतमध्ये पाहिले. त्या घरातील सर्व दिवे बंद होते आणि आतून कोणतीही हालचाल दिसून येत नव्हती. मी अल्फाला हात दिला आणि आम्ही दोघेही अलगदपणे आत उतरलो.

“लपण्यासाठी एखादी जागा दिसतेय का बघ.” अल्फा म्हणाला. मी काळोखात बुडालेल्या आवारावरुन नजर फिरवली. गेटला लागूनच शोभेच्या झाडांची एक ओळ होती. तिच्या मागे थांबल्यास बाहेरून येणाऱ्याला आम्ही दिसणे शक्य नव्हते. अल्फाने तिकडे इशारा केला. पायाखाली सुकलेली पाने सर्वत्र पसरलेली असल्यामुळे आवाज न करता चालणे कठीण होते. शक्य तितक्या शांतपणे आम्ही त्या झाडांमागे जाऊन पोहोचलो आणि वाट पाहू लागलो.

“तो इथे येणार आहे?” मी अल्फाला विचारले. अल्फाने फक्त तोंडावर बोट ठेवले आणि गेटच्या दिशेने लक्ष केंद्रित केले. अतिशय बोचरी थंडी होती आणि मला

कुडकुडायला होत होतं. त्या ठिकाणी अतिशय नीरव शांतता होती. आमच्या श्वासांचा आवाज त्या शांततेत फारच मोठा भासत होता. कुठूनतरी रातकिड्यांची किरकिर ऐकू येत होती. इतकं विचलित करणारं वातावरण असतानाही अल्फा शांतपणे एकटक आवाराबाहेर पाहत होता.

आम्ही जवळपास दीड तास एकाच ठिकाणी उभारून वाट पाहत होतो. मी थोडंसं जरी हलण्याचा प्रयत्न केला, तरी अल्फा मला चिमटा काढून स्थिर राहण्यास बजावत होता. बराच वेळ तिथे काढल्यानंतर मला कंटाळा यायला लागला. अखेर आम्हाला तेथे हालचाल जाणवली. रात्रीचे दोन वाजले असावेत. कोणीतरी आवाराच्या भिंतीमागे येऊन उभारलं होतं. तेथे असलेल्या शांततेमुळे त्याच्या पावलांचा होणारा हलका आवाज आम्ही टिपू शकत होतो. माझ्या छातीत पुन्हा धडधडायला लागलं. अल्फा अधिक सावध झाला आणि तिकडे निरखून पाहू लागला. ती व्यक्ती मिनिटभर बाहेर उभी असावी. मग पुन्हा पावलांचा आवाज आला. आता तो भिंतीवर चढत होता. पुढच्याच क्षणी आम्हाला त्याची आतमध्ये उतरणारी आकृती दिसली. त्याने आपल्याला कोणी पाहत नाहीये ना, याची खात्री करून घेतली आणि तो सावकाशपणे आमच्याच दिशेने चालू लागला. गेटपाशी येताच तो वळला आणि घराच्या मागच्या दिशेने जाऊ लागला. तो थोडा पुढे गेला आणि मला काय होतंय, हे समजायच्या आतच अल्फाने झाडांवरून उडी मारून त्याच्यावर पाठीवर झडप घातली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे तो गडबडून गेला. पण लगेचच सावरून अल्फाच्या तावडीतून सुटण्याची त्याची धडपड चालू झाली. अल्फाला त्याने एक गुद्दा लगावला. पण अल्फाची पकड फारच घट्ट होती.

त्याला काही हालचाल करता येईना. हे सगळं पहात असताना एकदम मला जाग आली. अशा प्रसंगाला सामोरे जाण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. मी धाडस करून बाहेर पडलो आणि त्या व्यक्तिच्या समोर जाऊन मी एक सणसणीत ठोसा त्याच्या तोंडावर लगावला.

“ओय.. ओय..” तो जोरात ओरडला. रक्ताची चिळकांडी त्याच्या नाकातून उडाल्याचे मला जाणवले. अखेर त्याने शरणागती पत्करली आणि आपल्या गुडघ्यांवर तो बसला. आमच्या झटपटीमुळे आणि त्या घुसखोराच्या ओरडण्यामुळे त्या घराला जाग आली आणि आमच्या चोहोकडून दिवे लागले.

*

# 4.

त्या व्यक्तीने चेहऱ्यावर रुमाल बांधला होता. त्यामुळे आम्हाला त्याचा चेहरा लगेच दिसला नाही. अल्फाने त्याच्या शर्टात लपवलेला दोर बाहेर काढला आणि झटक्यात त्या घुसखोराला बांधून टाकले. त्या घरातून एक चाळीशीतला माणूस धावतच बाहेर आला.

“क्.. कोण.. कोण आहात तुम्ही??” त्याने धसकून विचारले. त्याच्या हातात दंडुका होता आणि तो आम्हा तिघांकडे घाबरून पाहत होता.

“शांत व्हा, शांत व्हा. आम्ही तुमची मदतच करायला आलोय.” अल्फा म्हणाला, “ हा तुमच्या घरात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत होता. त्याला आम्ही जेरबंद केले आहे. त्यामुळे घाबरण्याचे काहीच कारण नाहीये.”

“हा.. हा कोण आहे?? आणि तुम्ही कोण आहात.. ??” अजूनही त्याच्या बोलण्यात अविश्वास दिसत होता.

“मी डिटेक्टिव्ह अल्फा. आणि हा माझा मित्र प्रभव. आम्हाला सांगलीचे माजी पोलीस आयुक्त भालचंद्र प्रधान यांनी इथे पाठवलंय.” अल्फा कणखर आवाजात म्हणाला, “ आणि हा कोण आहे, ते आता आपण पाहुयाच.”

त्याने त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरचा रुमाल खसकन ओढला.

तो एक गोल चेहऱ्याचा, किंचीत सावळ्या वर्णाचा, गटाण्या डोळयांचा माणूस होता. केस आखूड आणि थोडे काळे थोडे पांढरे असे होते. त्याला दरदरून घाम फुटला होता आणि थरथर कापतआहे तो आम्हा दोघांकडे पाहत होता.

“तू देशमुखांचा पुतण्या का रे??” त्या घराचा मालक त्याच्याकडे दुरूनच वाकून पाहत म्हणाला.

“मला माफ करा.. माझी चूक झालीये.. प्लीज प्लीज मला जाऊ द्या..” तो गयावया करू लागला.

“हो हो, नक्की जाऊ देणारे आम्ही तुला - पोलीस ठाण्यात!!” अल्फा आपला गाल चोळत म्हणाला.

“हा माझ्या घरात चोरी करत होता का? तुम्ही त्याच्या मागावर कसे? हे नक्की काय प्रकरण आहे मला काही कळेल का??” त्या घराच्या मालकाने विचारले.

“सांगतो, सांगतो. तुम्ही एक काम करा. गावच्या पोलीस चौकीत फोन करा आणि त्यांना ताबडतोब इकडे यायला सांगा. तिथे सर्वकाही सविस्तर सांगेन

मी. प्रभू, आपल्याला याला समोरच्या पाटीलबाईंच्या घरी न्यायचंय. मला थोडीशी मदत कर."

आम्ही आमच्या कैद्याला आजींच्या घरात आणले आणि एका ठिकाणी बसवले. आजी हे सगळं पाहून थक्कच झाल्या होत्या आणि त्यांच्या तोंडातून एक शब्दही बाहेर पडत नव्हता. त्या बावरून बांधलेल्या अवस्थेतील चोराकडे पहात राहिल्या. एव्हाना सगळी गल्ली जागी झाली होती. आमचे शेजारी आतमध्ये आले आणि त्यांच्यापाठोपाठ आणखी दोनतीनजण आले.

"कुठाय तो??" एक भरगच्च मिशीवाला आत येत म्हणाला, " हा बघा.. काय रे रंज्या.. दरोडे घालायचं काम कधीपासून सुरू केलंस? आम्ही तर चांगला पोरगा समजलो की तुला!! थांब तुला चांगला बडवतो आणि मग तुझ्या काकाच्या हवाली करतो.."

त्याला पकडून बडवण्यासाठी ती मंडळी पुढे सरसावली,  पण अल्फा त्यांच्या मध्ये उभा राहिला.

"थांबा."अल्फा खणखणीत आवाजात म्हणाला, "आधी त्याचं म्हणणं ऐकून घ्या आणि मग तुम्हाला जे काय करायचंय ते करा."

"तू कोण रे पोरा? चल हो बाजूला!!" ते सर्वजण आपले हात मोकळे करायच्या उद्देशानेच आलेले होते, असं मला वाटलं.

“याला घुसखोरी करताना मीच पकडलेलं आहे. मी एक डिटेक्टिव्ह आहे. सांगलीचे माजी पोलीस अधीक्षक श्री. प्रधान यांनी मला हे प्रकरण हाताळण्यास पाठवले आहे.” प्रधानांचे नाव ऐकताच ते लोक जरा कचरले, “ त्यामुळे मला यात हस्तक्षेप चालणार नाही. मागे व्हा सर्वजण. पटकन!!”

अल्फाचा कणखरपणा पाहून क्षणभर मीही चकितच झालो. शेवटी आमचे शेजारी बोलले,

“होय. हे खरं सांगताहेत. यांनीच त्याला माझ्या घरात घुसताना पकडलंय.”

ते ऐकताच जमलेली मंडळी थोडी शांत झाली. अल्फाने सर्वांकडे तीक्ष्ण कटाक्ष टाकला.

“धन्यवाद. आपलं नाव सांगाल का?” त्याने शेजारच्या काकांना विचारले.

“मी शिवराज उरणे. गावच्या एमएसइबीत काम करतो.”

“आणि हा कोण आहे?” त्याने आमच्या कैद्याकडे बोट दाखवित विचारले.

“हा रणजित देशमुख. वाडीतल्या अण्णा देशमुखाचा पुतण्या.”

“बरं.” अल्फा म्हणाला, “ मंडळी, आता थोडं शांतपणे घ्या. बसा इकडे. मी आता या प्रकरणाचा खुलासा करणार आहे. हे प्रकरण तुम्हाला दिसतंय तसं साधंसुधं नाहीये आणि हा तुमच्या समोर दिसणारा कैदी काही साधासुधा घुसखोर नाहीये.

फार मोठं षडयंत्र रचण्यात याचा सहभाग आहे. त्यामुळे याच्या तोंडून त्याचा गुन्हा वदवून घेणे महत्त्वाचे आहे.”

अल्फाचं ते बोलणं ऐकून आम्ही सर्वजणच बुचकळयात पडलो. त्याने बोलण्यास सुरूवात केली,

“या पाटीलबाई काल सांगलीतील आमच्या घरी आल्या होत्या. त्यांनी आम्हाला सांगितले, की त्यांच्या घरात कोणीतरी रात्री शिरत असल्याचा त्यांना भास होतो. त्याचा छडा लावण्यासाठी मी आणि माझा मित्र प्रभव काल सायंकाळी इथे आलो. थोडी तपासणी करताच माझ्या लक्षात आले, की त्यांना भास होत नसून खरेच कोणीतरी तिथे येऊन गेलं होतं. मग प्रश्नांची मालिका सुरू झाली. असं कोण आणि का करत असावं?? पहिला मला वाटलं, की पाटलांनी त्यांच्या घरात काहीतरी दडवून ठेवलंय आणि ते मिळविण्यासाठी कोणाचेतरी प्रयत्न सुरू आहेत. पण दोन गोष्टींनी माझी ही कल्पना फोल ठरवली. एक म्हणजे, मी जितकी माहिती काढली त्यातून स्पष्ट होत होतं, की परशुराम पाटील एक सरळमार्गी आणि गरीब माणूस होता. त्याच्याकडे लपवून ठेवण्यासारखं असं काहीच नव्हतं. आणि दुसरं म्हणजे, आम्ही घराचा कानाकोपरा तपासून पाहिला. पण आमच्या हाती काहीच लागलं नाही. याचा अर्थ सरळच होता. पाटीलबाईंच्या घरी काही नव्हतंच. मग तो घुसखोर नक्की काय शोधत होता??

मग हळूहळू मला वाटायला लागलं, की यात निश्चितच काहीतरी मोठी गडबड आहे. सरळ विचार करून हा गुंता सुटणार नाही. मग मी थोडा मेंदूला ताण

दिला आणि दुसऱ्या काय शक्यता असू शकतात, याचा विचार करू लागलो. पाटलांनी आपल्या घरात काही लपवले नसेलही, पण त्यांनीच लपवायला हवं असं कुठे आहे? जर दुसऱ्या कोणीतरी त्यांच्या नकळत त्यांच्याच घरात काहीतरी लपवून ठेवले असेल तर?? मग असे करण्याची वेळ कोणावर येऊ शकते, याचा विचार मी करू लागलो. एखाद्याने गैरमार्गाने मिळवलेले पैसे लपविण्यासाठी पाटीलबाईंच्या सुनसान घराचा आधार घेतलेला असू शकतो. तो गैरमार्ग म्हणजे काय, तर चोरी, दरोडा किंवा लूटमारीचे प्रकरण असणार अथवा कुणाचीतरी फसवणूक केली गेलेली असणार.

हा विचार मनात येताच मी झटपट कामाला लागलो एकतीस डिसेंबरच्या रात्री पाटीलबाईंना प्रथम शंका आली होती, की घराच्या आवारात कोणीतरी आहे. त्यावरून मी अंदाज लावला, की त्याआधीच्या दोनचार दिवसांतच हे चोरीचे किंवा फसवणूकीचे प्रकरण घडले असले पाहिजे. त्यानुसार मी थोडी वृत्तपत्रे चाळली आणि मग मला हवे ते सापडायला फार वेळ लागला नाही. ती घटना म्हणजे एकोणतीस डिसेंबरला सांगलीच्या पेठेतील सोन्याच्या दुकानात झालेली चोरी!! काय महाशय, काही चुकत तरी नाहीये ना माझं??”

अल्फाने हेतूपूर्वक रणजितकडे पाहत विचारले. त्याने जी खाली मान घातली होती, ती वर काढलीच नाही.

“एकोणतीस तारखेच्या रात्री दुकान बंद व्हायच्या वेळी दोन दरोडेखोरांनी दुकानात शिरून बंदुकीचा धाक दाखवित जवळपास दीड कोटींचा माल लंपास केला. त्यांनी तो माल एका चारचाकीमध्ये भरला आणि तेथून पळ

काढला. पोलिसांत ही खबर जाईपर्यंत ते सांगलीतून बाहेर पडून मिरजेत पोचले होते. सगळीकडून पोलिसांना पाचारण करण्यात आले आणि टोल नाक्यांवरतीही खबर पोचवली गेली. पण पोलिसांना त्यांना पकडण्याचे कष्ट करावेच लागले नाहीत. कारण या गाडीला अर्जुनवाडपासून साधारण दोन किलोमीटर अंतरावर भीषण अपघात झाला आणि त्यात त्या दोन्ही दरोडेखोरांचा अंत झाला. पण कोड्यात टाकणारी गोष्ट ही होती, की त्या गाडीत त्यांनी चोरलेला माल नव्हताच..!! पोलीस अजूनही त्या मालाच्या शोधात आहेत. त्या बिचाऱ्यांना ठाऊकच नाहीये, की यामध्ये एक पडद्याआडचा कलाकारदेखील आहे आणि आता सगळी सूत्रे तो सांभाळतोय..”

तिथे जमलेल्या लोकांमधून कुजबुज ऐकू येऊ लागली. कुणालाच पटत नव्हतं, की हा वरून मिळमिळीत दिसणारा तरूण पोरगा एवढा मोठा हात मारू शकेल. तेथे येऊन पोचलेले अण्णा देशमुखही पुतण्याचा प्रताप ऐकून गारद झाले.

“हे.. हे खरं आहे का?? यात तुझाही सहभाग आहे का??” त्यांनी अडखळत त्याला विचारले.

“होय. खरं बोलतायत हे..” शेवटी त्याने आपल्या तोंडातून शब्द बाहेर काढले, “हा कट रचण्यात मीही सहभागी झालो होतो.”

“पण.. पण.. तू.. कसं काय..” त्यांच्याकडे पाहून असं वाटत होतं, की त्यांचा अजूनही यावर विश्वासच बसत नाहीये.

“माझी चूक झाली अण्णा.. खरंच.. एका छोट्या संकटातून बाहेर पडण्यासाठी मी खूप मोठं संकट स्वतःवर ओढवून घेतलं. मी काय करतोय याचं मला भानच राहिलं नव्हतं अण्णा.. मी स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला वाचविण्यासाठीच हे सगळं करत होतो.”

“तू मला जसा दिसतोस त्यावरून आणि एकूण गावकऱ्यांच्या प्रतिक्रियेवरून मला असं वाटतंय की तू एक साधा सरळ माणूस आहेस. बरोबर ना??” अल्फाने शांतपणे रणजितला विचारले, “ मग इतका मोठा गुन्हा करण्यास तू का प्रवृत्त झालास?? काय कारण होतं यामागे??”

“यामागचं कारण फक्त एकच. माझा मूर्खपणा!!” तो बोलू लागला, “ माझे आईवडील मी लहान असतानाच वारले. लहानपणापासून माझा सांभाळ माझ्या काकांनीच केला. त्यांनी मला शिकवलं, बी कॉम केलं. माझं कॉलेज होऊन दोन वर्षे झाली. तसा मी अभ्यासात बरा होतो. पण माझा स्वभाव अबोल. त्यामुळे मला कुठे नोकरी लागेना. हळूहळू मला डिप्रेशन येऊ लागलं. काम नसल्यामुळे घरी बसणं असह्य होऊ लागलं. माझे गावातले काही मित्र होते. तेही माझ्यासारखेच बेरोजगार होते. त्यांनी मला पैसे कमविण्याचा एक वेगळाच मार्ग सांगितला - जुगार!! मी त्यांच्या संगतीने जुगाराच्या नादी लागलो. सुरूवातीला पैसे मिळू लागले. त्यामुळे मला त्याची चटकच लागली. पण नंतर मात्र मी चांगलाच बुडू लागलो. मी इकडून तिकडून पैसे उसने घेऊन जुगारात लावू लागलो-आपले गेलेले पैसे कधीतरी परत मिळतील, या आशेने. त्या नादात मी कधी कर्जबाजारी झालो, हे मलाच कळालं

नाही. जेव्हा कर्जाचा आकडा दहा लाखांवर पोहोचला, तेव्हा मी भानावर आलो. इतकी प्रचंड रक्कम घरी न सांगता मला परत करायची होती. ज्यांच्याकडून पैसे घेतले होते, त्यांनीही ते परत देण्यासाठी तगादा लावला होता. मी खूप घाबरलो. मला आत्महत्या करावी, असं वाटू लागलं. इतक्यात माझ्यासारख्याच जुगाराला बळी पडलेल्या एका मित्राने माझ्यासमोर एक कल्पना मांडली - दरोड्याची!!

मी तर आजपर्यंत मंदिरातून साधी चप्पलदेखील चोरली नव्हती. आणि हा पठ्ठ्या दरोडा टाकण्याच्या गोष्टी करत होता. त्याचा अजून एक मित्र होता, जो चोरी-लूटमारीच्या कामात मुरलेला होता. त्याला हाताशी धरून आम्ही योजना आखण्यास सुरूवात केली. माझ्यात खरे तर हे सर्व करण्याइतकी धमक नव्हती ; पण आत्महत्येपेक्षा हा मार्ग काय वाईट आहे, असा मी विचार केला. कदाचित यात यश मिळेल आणि सगळे प्रश्न सुटतीलही, कोण जाणे!! मग आमचा प्लॅन ठरला. मी या कामासाठी फारच लेचापेचा आहे, हे त्या दोघांनी ओळखले आणि मला दरोड्याच्या ठिकाणापासून दूरच ठेवायचे ठरवले. त्याऐवजी मला त्यांनी दुकानाची कणन् कण माहिती काढण्याचे आणि दरोडा यशस्वी झाल्यानंतर माल ताब्यात घेण्याचे काम दिले. ते दोघे तेथे जाऊन ही कामगिरी पार पाडणार होते. आम्ही ठरवले, की चोरीचा माल लगेच बाहेर काढायचा नाही. तो त्यांनी एका ठिकाणी लपवून ठेवायचा आणि मी तेथून तो माझ्या ताब्यात घ्यायचा. यासाठी वाडीच्या टोकाला शेतापाशी असलेले पांढऱ्या रंगाचे आजींचे घर हे ठिकाण ठरले. तेथे आजी एकट्याच राहतात, हे मला ठाऊक होते. त्यामुळे मीच हे ठिकाण त्यांना सुचवले होते. त्यामुळे

त्या दोघांनी तेथे माल ठेवला, की इकडे मी लगेचच ते कोणालाही न कळता उचलू शकणार होतो.

ठरल्याप्रमाणे गोष्टी पार पडल्या. दरोडा यशस्वी झाला आणि ते दोघे माल घेऊन निघाले. मी त्यांच्या संपर्कात होतोच. त्यांनी आजींच्या घरात माल ठेवल्याचा मला मेसेज केला. मी मध्यरात्री तेथे जाऊन ते माझ्या ताब्यात घेणार होतो. पण रात्री बाराच्या सुमारास मला त्यांच्या गाडीला अपघात झाल्याचे आणि त्यात ते दोघेही ठार झाल्याचे समजले. मला खूप मोठा धक्का बसला. मी लपवलेला माल घेण्यासाठी बाहेरदेखील पडू शकलो नाही, इतका मी घाबरलो होतो. मला प्रथम वाटले, की पोलिसांना चोरीच्या मालाचा पत्ता लागेल आणि तो ते जप्त करतील. पण पुढच्या दिवसभरात असे काहीही घडले नाही. मग मला वाटू लागले, की पोलिसांना त्या मालाचा सुगावा लागण्याआधी धाडस करून आपल्याला तो हस्तगत केला पाहिजे. त्यानुसार मी दुसऱ्या रात्री आजींच्या घरात शिरलो. ठरल्याप्रमाणे तो माल आवारातील बागेत मिळेल, अशी माझी अपेक्षा होती. पण मी खूप शोधूनही मला काही मिळाले नाही. त्यापुढील रात्री मी पुन्हा शोध घेतला. पण माझ्या हाती काही लागेना. त्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने तो माल घरात तर ठेवला नव्हता ना?? मी घरात घुसायचे ठरवले. हे करण्यात निश्चितच धोका होता. पण मी ती संपत्ती मिळविण्यासाठी काहीही करायला तयार झालो होतो. त्यामुळे मी घराच्या आतमध्ये प्रवेश मिळवला आणि सलग दोन रात्री ते घरही धुंडाळून काढले. पण मला तो माल कुठेही मिळाला नाही."

“कारण सरळ होते. चोरलेला ऐवज या घरात नव्हताच!!” अल्फा म्हणाला.

“मग कुठे होता??” लोकांच्यातून आवाज आला.

“तो शेजारच्या उरणेंच्या घरात होता!”

ऐकून उरणे तर पार उडालेच.

“आँ.. माझ्या घरात.. करोडोंचा माल होता??”

“होय.” अल्फा म्हणाला, “ रणजितने त्याच्या दोन साथीदारांना वाडीच्या शेवटाला असलेल्या पांढऱ्या घरात चोरलेला माल लपवायला सांगितला खरा, पण त्यावेळी त्याच्या हे लक्षातच आले नाही, की आजींच्या घराच्या समोरील घराचा रंगदेखील पांढराच आहे!! ते दोघे त्या रात्री आले आणि गडबडीत त्यांनी आजींच्या घरात माल न लपवता उरणेंच्या घरात लपवला. त्यामुळेच तो सापडायला पाच दिवस गेले. हे जर रणजितच्या आधीच लक्षात आले असते, तर तो सगळा माल घेऊन केव्हाच पसार झाला असता. पण नशीब पहा. आजच त्याच्या ही गोष्ट लक्षात आली आणि उशीरा का होईना , मीही त्याच निष्कर्षाप्रत येऊन पोहोचलो. त्यामुळे बरोबर मासा गळाला लागला.”

रणजितच्या डोळयांतून अश्रू वाहू लागले. 'काका.. मला माफ करा' एवढेच तो म्हणू शकला. अर्जुनवाड पोलीस चौकीतून आलेले पोलीस तेथे हजर होतेच. त्यांनी रणजितला ताब्यात घेतले.

“उरणेंच्या घराच्या आवारात थोडा तपास करून पहा. मोठ्ठं घबाड लपवून ठेवलंय तिथे.” अल्फा हसून म्हणाला, “चोरीचा माल शोधण्यासाठी वणवण फिरणाऱ्या पोलीसांना ते पाहून खूपच बरं वाटेल.”

आजींनी भरल्या डोळ्यांनी आमचे आभार मानले. भल्या पहाटे आम्ही आमच्या घरी जायला निघालो.

……

“मला सुरूवातीलाच खात्री झाली होती, की हा घुसखोर अर्जुवनवाडचाच राहणारा आहे.”अल्फा आमच्या रूमचे कुलूप काढत म्हणाला, “ तो घुसखोरी मध्यरात्रीच का करत होता? कारण मागच्या शेतात काम करणारे मजूर त्याला ओळखत असणार आणि त्यामुळे दिवसाढवळ्या कोणाला शंका येईल असे काही तो करूच शकत नव्हता. पण या गोष्टीचा माझ्या तपासात काहीच फायदा झाला नाही. पण असो. वेळेवर माझी ट्यूबलाईट पेटली, हेही नसे थोडके!!”

पहाट झाली होती. पूर्व दिशेचे क्षितिज आपला रंग बदलू लागले होते. मी चालता चालताच पेंगत होतो, इतका मला थकवा आला होता. आम्ही आत शिरलो आणि मी अल्फाच्या डोक्यावर मागून जोरात टपली हाणली.

“आईगंऽऽ..” तो डोके चोळत मागे वळला, “ झोपेत आहेस का?? का मारतोयस??”

“तूच मला मघाशी म्हणालास की हे प्रकरण झाल्यानंतर माझ्या डोक्यात एक टपली हाण म्हणून.. अतिशय कर्तव्यदक्ष मित्र आहे मी तुझा.. चल थँक्यू म्हण..”

मी फटाफट कपडे काढत बोललो. अल्फा मोठ्याने हसला आणि मला गुद्दा हाणायला माझ्या दिशेने धावला.

मला प्रचंड झोप आली होती आणि एक मिनिटही न दवडता मला माझ्या बेडवर झेप घ्यायची होती. अल्फा माझ्यापर्यंत पोहोचण्याआधीच मी बेडवर आडवा झालो आणि माझे डोळे मिटलेही. त्यापुढचे मला काही आठवत नाही.

*समाप्त *

*अल्फाने जुन्या घराचे गूढ कोडे तर सोडवले ; पण त्यातून नव्या कोड्यांना तोंड फुटणार आहे. काळाच्या पडद्यामागे अनेक रहस्ये झाकली गेलेली आहेत, जी या प्रकरणातून अनपेक्षितपणे बाहेर येणार आहेत आणि सुरू होणार आहे एक चित्तथरारक, जीवघेण्या साहसांची मालिका.. .*

डिटेक्टिव्ह अल्फाचा पुढील भाग लवकरच येत आहे!!

**अंधारातील पाऊल**

## डिटेक्टीव्ह अल्फ़ा हा येत्या काळातील

## मराठीतील सर्वात हिट डिटेक्टिव्ह असणार आहे.

## याच्या प्रवासाचे भागिदार व्हा.

## पुढील पुस्तकांसाठी आणि या पुस्तकावर आपल्या प्रतिक्रिया देण्यासाठी



## संपर्क करा

सौरभ वागळे

'निसर्ग' प्लाझा, सांगलीवाडी,

सांगली.

फोन : 8983234042

ईमेल : sourabhwagale@yahoo. com

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.